दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -२९३ | गुरूवार,दि.२६ जुन २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-293 | Thursday, Dt.26 June 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

### ८० हजाराची लाच घेताना पाणी पुरवठा विभागाचा पाण्यात पाप करणारा

# प्रभारी कार्यकारी अभियंता आंधळे रंगेहात पकडला

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे आणि वरिष्ठ लिपिक किरण कुमार हिवाळे या दोघांना ८० हजार रुपयांची लाच घेताना बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी अटक केली. या कारवाईमुळे ग्रामीण पाणी पुरवठा आणि बीड जिल्हा परिषदेत खळबळ उडाली आहे.

बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामध्ये मोठ्या प्रमाणात लाचखोरी सुरू असल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडलेल्या आहेत. सध्या बीड जिल्ह्यात जलजीवन मिशनची कामे सुरू आहेत. या कामाच्या टेंडर प्रक्रियेपासून ते फायनल बिल काढण्यापर्यंत कार्यकारी अभियंता असो की यापूर्वीचे गेल्या तीन वर्षातील कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता एवढेच काय पण टेंडर क्लर्क पासून ते शिपायापर्यंत अनेक जण वादातीत आहेत.

मंगळवार दिनांक २५ रोजी दुपारनंतर प्रभारी कार्यकारी अभियंता




मुकुंद आंधळे लिपिक किरण हिवाळे या दोघांनी ८० हजार रुपयांची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांना रंगहात पकडले.

सदर कारवाई संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर, मुकुंद आघाव, अपर पोलीस अधीक्षक लाप्रवि छत्रपती संभाजी नगर, पोलीस उप अधीक्षक सोपान चिट्टमपल्ले, पोलीस निरीक्षक समाधान कवडे, पोलीस निरीक्षक राहुलकुमार भोळ, सपोउपनि सुरेश सांगळे, पोलीस अंमलदार मच्छिंद्र बीडकर, पांडुरंग काचगुडे, अनिल शेळके अविनाश गवळी, अमोल खरसाडे संतोष राठोड प्रदिप सुरवसे, अंबादास पुरी यांनी कारवाई केली आहे.पाणी पुरवठा विभागात अनेकांची बिले काढण्याचे काम सदर तक्रार दिल्याचे समजते.बीड जिल्हा परिषदेच्या बहुचर्चित पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यावर लाचेची कारवाई झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

# चकलांबा पोलिसांनी पकडला वाळू वाहतूक करणारा हायवा

बीड /प्रतिनिधी

चकलांबा-पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवायाच्या दिलेल्या सुचनेनुसार चकलांबा पोलिसांच्या वतीने कारवाईची मोहीम राबविण्यात येतं आहे. उमापूर-माटेगाव रस्त्यावर वाळू वाहतूक करणारा एक हायवा सपोनि संदीप पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी रस्त्यावर वाहने आडवी लावून ताब्यात घेतला आहे. यावेळी एका आरोपीला पकडण्यात आले असून या कारवाईत २५ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मंगळवारी रात्री गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली की एक हायवा वाळू भरून उमापूर ते माटेगाव असा जात आहे , तरी सपोनि पाटील स्वतः स्टाफ सह लागलीच मालेगाव येथे सापळा रचून बसले होते. यावेळी भरधाव वेगात हायवा येतं असल्याचे दिसतात रस्त्याच्या मध्यभागी एक दुचाकी हायवला आडवी लावण्यात आली व हायवा पोलिसांनी ताब्यात घेतला. यावेळी गाडी मध्ये वाळूची चोरट्या मार्गाने तस्करी करण्यात येतं असल्याचे समोर आले. त्यानुसार सरफराज राजू पठाण विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक श्री. राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पोह अमोल येळे, विनोद सुरवसे,प्रशांत घोंगडे यांनी केली.



एक आरोपी ताब्यात
२५ लाखांचा मुद्देमाल जप्त



बीड - श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे आजोबा ब्र. गोविंदपंत श्री समाधीक्षेत्र बीड येथून आज आषाढीवारी साठी दिंडी मार्गस्त झाली. तत्पूर्वी संस्थान च्या वतीने निमंत्रित शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ साहेब यांच्या हस्ते पालखीची पालखीचे पुजन करून आरती करण्यात आली. यावेळी जेष्ठ नागरिक भरत लोळगे, डॉ शिवप्रसाद चरखा, संजय हरणे, नवनाथ प्रभाळे, गणेश लोणकर सह भक्तगण मोठया संख्येने उपस्थित होता.

### आशा वर्कर यांनी एचआयव्ही आजाराबद्दल समाजातील शेवटच्या घटकापर्यंत

## जनजागृती करावी - धनराज पवार

अंबाजोगाई/प्रतिनिधी

आज दिनांक २५ जून रोजी तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयात अंबाजोगाई याठिकाणी आयसीटीसी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय यांच्यावतीने आशा वर्कर साठी एच आय व्ही एड्स या आजाराबद्दल मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते या शिबिरासाठी जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय बीड तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी बीड यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व माननीय तालुका आरोग्य अधिकार मा बालासाहेब लोमटे सर यांच्या



मार्गदर्शनाखाली आज अंबाजोगाई तालुक्यातील सर्व
(उर्वरीत पान २ वर)



बीड - महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या वतीने उपाध्यक्ष अशोक आठवले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान याचे भारतीय संविधानाने ग्रंथ देऊन सन्मानित केले.

### आमदार संदीप क्षीरसागर यांचा जनतेचा प्रश्न सोडवण्यासाठी

# आमदार आपल्या गावी व दारी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

पाली (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील मौजे पाली येथे दि. २५ जून २०२५ रोजी आमदार आपल्या गावी व दारी कार्यक्रमास मोठा प्रतिसाद मिळाला असून आमदार संदीप भैया क्षीरसागर यांनी जनतेच्या प्रश्न ऐकून व तो सोडण्याचा प्रयत्न त्या त्या विभागातील अधिकाऱ्याशी बोलून हा मार्ग लावा असे सांगितले त्यामुळे सामान्य जनतेचा समस्या सोडवण्याचा आमदार संदीप क्षीरसागर यांनी प्रयत्न करत असल्यामुळे जनतेमध्ये उत्साह दिसून आला घरकुल, रस्त्याच्या प्रश्न, लाईटचा प्रश्न,निराधार चा प्रश्न, इतर शासकीय योजना तसेच इतर प्रश्न लोकांनी मांडले . ते सर्वांचे म्हणणे ऐकून लगेच अधिकाऱ्यांशी त्याच ठिकाणी बोलून ते मार्गी लावण्याचे प्रयत्न आमदार संदीप क्षीरसागर यांनी केले पाली, आहेर वडगाव, कर्जनी, मांडवजाळी, मंझेरी हवेली, समनापुर, आधी गावचे नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमास



माजी आमदार सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, गोरख शिंगन उद्धवसेना तालुका अध्यक्ष, बाळासाहेब गोरे तालुकाध्यक्ष,यांची प्रामुख्याने उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी पाली गावातील शरद चंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते व पाली पंचायत समिती गणातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात प्रामुख्याने दीपक हजारे, रवींद्र राऊत, रामु नवले , सुंदर गवळी ,लक्ष्मण नवले, चंदू शेळके,गजानन कापले, इरफान शेख, शेख अश्कर, उत्तरेश्वर पूर्भे, शिवम राऊत
(उर्वरीत पान २ वर)

# विशेष प्रदर्शनाच्या माध्यमातून लोकशाही अबाधित ठेवण्याच्या लढ्याला उजाळा !

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते उद्घाटन आणीबाणीच्या काळातील घटनांवर आधारित प्रदर्शन




बीड : देशात २५ जून १९७५ रोजी लागू झालेल्या आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त जिल्हा परिषदेच्या प्रांगणात आयोजित विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनामध्ये आणीबाणीच्या काळातील आव्हानात्मक परिस्थितीत लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांना उजाळा देण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासन व बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान, अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंखे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील, उपजिल्हाधिकारी शैलेंद्र सूर्यवंशी, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ.श्याम टरके, जिल्हा परिषदेतील सर्व वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आदींची उपस्थिती होती.
(उर्वरीत पान २ वर)

## निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि गृह उपविभागीय पोलीस अधिकारी उमाकांत कस्तुरे यांच्या शुभहस्ते

### वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा २९ जून रविवारी होणार गुणगौरव सोहळा - विकास स्वामी, वैभव स्वामी

बीड /प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा अधिक गुण घेतले आहेत. अशा विद्यार्थ्यांचा निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब आणि पोलिस गृह उपविभागीय पोलीस अधिकारी उमाकांत कस्तुरे यांच्या सह मान्यवरांच्या शुभहस्ते यथोचित गुणगौरव सत्कार करण्यात येणार

आहे. सत्कारास पात्र असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांनी जगद्विवेक प्रतिष्ठानकडे तात्काळ संपर्क साधावा असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी आणि सचिव वैभव स्वामी यांनी केले आहे.

जगद्विवेक प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष आदर्श मुख्याध्यापिका शिवैक्य जगदेवी विवेक स्वामी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून
(उर्वरीत पान २ वर)

## बीडमध्ये बालेपीरमधील एका मंगल कार्यालयात भरते अनधिकृत शाळा !

### मुलांचे भवितव्य धोक्यात असल्याने शिक्षणाधिकाऱ्यांकडे परिसरातील शिक्षकांनीच केल्या तक्रारी !!

बीड /प्रतिनिधी

शहरातील बालेपीरमधील एका मंगल कार्यालयात अनधिकृत शाळा सुरु असून याचा शिक्षण विभागाला थांगपत्ता नसल्याचे समोर आले आहे. या शाळेत प्राथमिक आणि माध्यमिकसाठी विद्यार्थ्यांचे प्रवेश घेतले जात असून शाळा अनधिकृत असल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याचा हा प्रकार आहे. या शाळेच्या चालकावर कारवाई करुन शाळा बंद करण्याची मागणी बालेपीर परिसरातील १० ते १२ माध्यमिक आणि प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी शिक्षणाधिकाऱ्यांकडे केली आहे.

बीड शहरात माध्यमिक आणि प्राथमिकच्या अनेक खासगी शाळा असून यातून हजारो विद्याथ शिक्षण घेत आहेत. मात्र शहरात बऱ्याच अनधिकृत शाळा सुरु असल्याची बाब आता समोर आली असून याचा शिक्षण विभागाला थांगपत्ता नसल्याचे म्हटले जात आहे. बालेपीर परिसरात ४ माध्यमिक आणि ६ प्राथमिक शाळा असून या सर्व शाळा अधिकृत आहेत. शैक्षणिक वर्ष २५-२६
(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय

# एसटीची सुधारणा करताना प्रवासी केंद्रस्थानी असावा

गाव तेथे रस्ता आणि रस्ता तेथे एसटी धावायला हवी, असे गेल्या अनेक दशकांपासून राज्याच्या दुर्गम भागात राहणाऱ्या गावकऱ्यांचे स्वप्न असते. राज्यातील सर्वसामान्यांना परवडणारी एसटीची सेवा आज शहरापासून ग्रामीण भागापर्यंत अव्याहतपणे सुरू आहे. पण, काळाच्या या चक्रात एसटी महामंडळाला आर्थिक विंवचनेतून जावे लागले. 'प्रवाशांच्या सेवेत' हे एसटीच ब्रीदवाक्य आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतील प्रत्येकाला प्रवासाचा आधार म्हणजे आपली लालपरी वाटते. संकटकाळात एसटी अशी कशी उपयोगी पडते याचा प्रत्यय मुंबईकरांनाही आला होता. कोरोना काळात मुंबईतील लोकल बंद करण्याचा निर्णय झाला. त्यावेळी बेस्ट बसेसच्या जोडीला एसटी महामंडळाच्या गाड्या या मुंबईतील गल्लीबोळातून धावत होत्या. औरंगाबाद, जळगावमधील वाहनचालक हे आपले गाव सोडून मुंबईकरांच्या सेवेत होते. त्यामुळे मुंबईकरांना कोरोना काळात नोकरीवर जाण्यासाठी एसटी बसेसचा उपयोग झाला होता, याची जाणीव मुंबईकरांना आहे; परंतु हीच सेवा देणारी एसटी अडचणीत का आहे, हे जाणून घेण्याची उत्सुकता मुंबईसारख्या शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांनासुद्धा आहे.

एसटी महामंडळाची आर्थिक सद्यस्थिती दर्शवणारी एक श्वेतपत्रिका सोमवारी जाहीर झाली. एसटीचे एकूण महसुली उत्पन्न, खर्च, कर्ज आणि देयके किती आहेत? याबाबतचा आढावा घेणारी ती श्वेतपत्रिका होती. या श्वेतपत्रिकेत ४५ वर्षांचे अवलोकन करण्यात आले आहे. या ४५ वर्षांपैकी फक्त ८ वर्षेच महामंडळाला काही प्रमाणात नफा झाल्याचे दिसून आले आहे. उर्वरित सर्व वर्षात मोठ्या प्रमाणात तोटा झाल्याचे समोर आले आहे, त्यामुळे हा तोटा का झाला? यावर उपाययोजना काय आहे, याबाबत श्वेतपत्रिकेत नमूद केले आहे. एसटी महामंडळाने पुढील वाटचालीसाठी काही महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविलेल्या आहेत. अपघात कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. प्रवासी व मालमत्तांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही प्रणाली बसवली जाणार आहे. सध्या सवलत नसलेल्या लांब पल्ल्याच्या प्रवाशांसाठी भाड्यात सवलत देण्याचा विचार आहे. तसेच कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबवण्याची योजना देखील आहे. त्याचप्रमाणे, एसटी महामंडळाच्या ताफ्यात दरवर्षी ५ हजार नवीन बसेसचा समावेश करणे, एसटी ताफ्यात भाडेतत्त्वावरील हायटेक व्होल्वो बसेसचा समावेश करणे, एसटी महामंडळाच्या जागांवर इंधन पुरवठादार कंपन्याकडून महसुली भागीदारी तत्त्वावर खासगी वाहनांसाठी किरकोळ इंधन विक्री केंद्र सुरू करणे, एसटी महामंडळाच्या जागांचा बिओटी/पीपीपी तत्त्वावर विकास करणे, प्रवासी सोयी आणि सुविधा निर्माण करणे, उत्पन्न वाढीसाठी लक्षांक निश्चित करणे, आदी उपाययोजनांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे, एसटी महामंडळाने तोट्याची पाच महत्त्वाची कारणे या श्वेतपत्रिकेत सांगितली आहेत. त्यात, राज्य परिवहन महामंडळाकडे बसेसची कमतरता असल्याचा मुद्दा नमूद केला आहे. उपलब्ध असलेल्या बसेसचे आयुर्मान अधिक असणे आवश्यक आहे. अनिवार्य व तोट्यातील चलन, अनियमित भाडेवाढ, अवैध वाहतूक ही एसटी तोट्यात जाण्यास कारणीभूत ठरली आहे. श्वेतपत्रिकेनुसार, महसूल वाढीच्या काही उपाययोजनांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामध्ये उच्च दर्जाच्या व्होल्वो बस भाडेतत्त्वावर घेतल्या जाणार आहेत. महामंडळाच्या मालकीच्या जागांवर खासगी वाहनांसाठी इंधन पंप उभारण्यात येणार असून, त्यासाठी इंधन पुरवठादारांशी महसूल वाटप करार केले जाणार आहेत. तसेच, महामंडळाच्या मालमत्ता बीओटी किंवा पीपीपी मॉडेलवर विकसित केल्या जाणार आहेत. सी-कॅटेगरी मार्गांचे बी-कॅटेगरीत व बी-कॅटेगरीचे ए-कॅटेगरीत रूपांतर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रवासी सुविधांचा दर्जा उंचावणे आणि महसूल वाढीसाठी ठोस उद्दिष्टे निश्चित केली जाणार आहेत.

एसटी महामंडळाकडे पूर्वी कामगार वर्ग मोठा होता. मात्र आता कामगार वर्ग ७९ हजार आहे. आधी १८ हजार ५०० गाड्या होत्या. पण नंतर काही बसगाड्या मोडकळीस आल्या. गळक्या आणि तुटक्या बसेस रस्त्यावर चालत होत्या. गेल्या १० ते १२ वर्षांत हा ग्राफ कमी होत गेला आहे. नवीन बसेस घेतल्या नाहीत. ३ ते ४ वर्षांपूर्वी जर नवीन बसेस घेतल्या असत्या तर तोटा जास्त झाला नसता, याची कबुली परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. महामंडळाचा तोटा सुमारे १० हजारांपेक्षा अधिक आहे. तो भरून काढणे कठीण आहे. त्याचे कारण २५ ते ३० हजार बसेस आहेत, त्याच्या जीवावर तोटा भरून काढणार का? हा प्रश्न आहे. ७७ वर्षांचा एसटी महामंडळाचा इतिहास आहे. गेल्या १० ते १५ वर्षांत हळूहळू ग्राफ कमी होत गेल्याचे दिसत आहे. त्यासाठी दर वर्षाला ५ हजार बसेस ताफ्यात आवश्यक आहेत. जेणेकरून एसटी महामंडळ नफ्यात राहील. पुढच्या ३ ते ४ वर्षांत एसटी तोट्यात राहणार नाही, असा विश्वास श्वेतपत्रिकेतून व्यक्त करण्यात आला आहे, ही समाधानाची बाब आहे. मात्र, एसटी महामंडळाला फायद्यात आणताना, मोक्याच्या ठिकाणी असलेले एसटी डेपो हे महामंडळाच्या ताब्यात असावेत. ते खासगी कंपन्यांच्या ताब्यात जाऊ नयेत, ही प्रवाशांची भावना आहे.

# ७० लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या ३ आरोपीतांना घेतले ताब्यात

## जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई २१ लाख किंमतीचा मुद्देमाल केला हस्तगत

जालना /प्रतिनिधी

गांधीचमन जालना येथील संस्था चालक रवि प्रदीप खोमने यांनी पोलीस स्टेशन चंदनझिरा जालना येथे दिलेल्या फिर्यादीवरून खंडणीचा गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्यातील आरोपीताना ताब्यात घेऊन कारवाई करण्याची मा.पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव व पथकास सूचना दिल्या मा.पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करुन कारवाई करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले त्या अनुषंगाने सदर गुन्ह्यातील आरोपी नामे १.करण विलास निकाळजे वय २५ वर्ष,२.निलेश रावसाहेब निकाळजे वय २५ वर्ष दोघे रा.तांदुळवाडी ता.जि.जालना,३.मयुर कुंडलीक निकम वय २१ वर्ष रा.कन्हैयानगर जालना यांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेण्यात आले.चौकशी करुन आरोपीना विचार पुस केली असता सदर आरोपीतानी गुन्हयाची कबुली देऊन गुन्ह्यातील मुद्देमाल रु.७.९१.५००/- रोख रक्कम तसेच गुन्हा करताना वापरलेली रु.१०.०००.००/- किंमतीची टोयोटा ग्लांजा कार रु.१२००/-किमतीचे पिस्टल सारखे दिसणारे लायटर खंडणीच्या पैशांमध्ये खरेदी केलेले १.०७.०००/- किमतचे सोन्याचे दागिने खंडणीच्या पैशातून खरेदी केलेला रु.२.०५.०००/- किंमतीचा फोटोग्राफीचा सोनी कंपनीचा कॅमेरा असा एकूण रु.२१.०४७००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून उर्वरित आरोपींचा शोध घेतला जात आहे सदर आरोपीताना पुढील कार्यवाही कामी चंदनझिरा पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार



बन्सल,मा.अपर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव,सपोनि.श्री योगेश उबाळे,पोउपनि.श्री राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, सॅम्युअल कांबळे, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, लक्ष्मीकांत आडेप,सागर बाविस्कर, संदीप चिंचोले, सतिश श्रीवास, देविदास भोजने,धिरज भोसले, योगेश सहाने, सोपान क्षिरसागर,चालक सौरभ मुळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५०० / २०२५**
**सतीष राजाराम काळे विरूध्द निरंक**
**(मार्फत- ॲड पटेकर पी.एम, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे गयाबाई राजाराम काळे हे / हया दिनांक २२/०५/२०१९ रोजी मौजे तलवडा, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत.. अर्जदार क. १ सतीष राजाराम काळे वय - ७६ वर्षे, धंदा - शेती रा. तलवडा ता. गेवराई, जि. बीड, ह.मु. लक्ष्मीनारायण मंदीर रोड, गेवराई जि.बीड २ . गंगाधर राजाराम काळे, वय- ७४वर्षे, धंदा-शेती रा. तलवडा ता. गेवराई जि.बीड ३.प्रकाश राजाराम काळे, वय: ६५वर्षे, धंदा-शेतीरा. तलवडा ता. गेवराई जि.बीड ह.मु. बाजारगल्ली तिर्थपुरी ता. घनसांगवी जि. जालना ४. प्रल्हाद राजाराम काळे, वय: ६० वर्षे, धंदा-शेती रा. तलवडा ता. गेवराई जि.बीड ५.नंदु राजाराम काळे वय - ५८ वर्षे, धंदा-शेती रा. सदर ६. मदन राजाराम काळे वय-५० वर्षे, धंदा-शेती रा.सदर ७. सुमन वसंत तेलुरे वय-६३वर्षे, धंदा - शेती रा.सदर यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे गयाबाई राजाराम काळे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २०/०६/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०७/०८/२०२५

**स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर,**
**गेवराई**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर,**
**गेवराई**

**मा.श्रीमती, मनिषा एस. पठारे, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक:- ९५६/२०२५**
**(मार्फत विधिज्ञः- श्री ए. एस. कुलकर्णी)**

**अर्जदार**
**१. डॉ. नितीन पि. आबासाहेब गव्हाणे, वय- ४३ वर्षे, धंदा- नौकरी,**
**रा. पिंगळे नगर (पश्चिम), आशा टॉकीजच्या मागे, धानोरा रोड, बीड, ता.जि.बीड**
**२ अनुराधा आबासाहेब गव्हाणे, वय ४१ वर्षे, धंदा - नौकरी, रा. वरीलप्रमाणे.**
**३. अर्चना आबासाहेब गव्हाणे, वय ३९ वर्षे, धंदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे.**
**४. वर्षा आबासाहेब गव्हाणे, वय ३४ वर्षे, धंदा -नौकरी, रा. वरीलप्रमाणे.**
**५. आबासाहेब साहेबराव गव्हाणे, वय ६८ वर्षे, धंदा सेवानिवृत्त, रा. वरीलप्रमाणे,**
**विरुध्द**
**निरंक**
**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे शहाबाई आबासाहेब गव्हाणे हे दि. १९/०५/२०२५ रोजी राहते घरी बीड, ता. जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क २ ते ४ या मयताच्या मुली आहेत. अर्जदार क ५ हे मयताचे पती आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्षांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- २४/०६/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीखः- ०२/०८/२०२५.

**आदेशावरुन,**
**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**

पान १ वरून...

**आशा वर्कर यांनी...**

आशा वर्कर्स आणि सुपरवायझर यांच्यासाठी एचआयव्ही एड्स या आजाराबद्दल सखोल अशी मार्गदर्शन आयोजित करून त्यांना या आजाराबद्दल माहिती देऊन समाजामध्ये कार्य करत असताना प्रत्येक घटकातील व्यक्तीना एचआयव्ही या एड्स बद्दल माहिती दिली पाहिजे याबद्दल माहिती दिली तसेच आयसीटीसी आणि ए आर टी उपचार केंद्र याबद्दल पण माहिती देण्यात आली यावेळी कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सुपरवायझर काझी मॅडम व अमजद सर तसेच आशा वर्कर च्या सर्व सुपरवायझर उपस्थित होत्या यावेळी श्री धनराज पवार सर यांनी उपस्थित आशा वर्कर यांना अतिशय चांगल्या पद्धतीने माहिती देऊन आशा वर्कर यांची शंकांचे निरसन केले त्यासोबतच प्रदीप जिरे सर यांनी पण गरोदर माता बद्दल अशी सखोल असे मार्गदर्शन करून गरोदर माताची एचआयव्ही तपासणी का महत्त्वाची आहे हे पटवून दिले कार्यशाळा अंबाजोगाई तालुक्यातील सर्व गावातील आशा वर्कर मोठा संख्येने उपस्थित होत्या आणि कार्यक्रम संपन्न झाली.

**विशेष प्रदर्शनाच्या ...**

या प्रदर्शनाच्या माध्यमातून नव्या पिढीला त्या काळातील घटनांचा इतिहास आणि लोकशाहीच्या संरक्षणाचे महत्त्व समजण्यास मदत होणार असल्याचे मत जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी व्यक्त केले. याबरोबरच शालेय विद्यार्थ्यांसह सर्वांनीच या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. जॉन्सन यांनी केले.

आणीबाणीच्या ५० व्या वर्षपूर्तीनिमित्त हे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात आणीबाणीच्या काळातील महत्त्वाच्या घटना आणि लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी केलेल्या संघर्षाचा इतिहास चित्रांच्या माध्यमातून मांडण्यात आला आहे. आणीबाणीशी संबंधित विविध घटना, घडामोडी, त्या काळात लोकशाहीसाठी लढणाऱ्या मान्यवरांची छायाचित्रे, तसेच संक्षिप्त पण माहितीपूर्ण मजकूर आणि माहिती फलकांचा समावेश आहे.

या प्रदर्शनात आणीबाणीच्या कालावधीतील संपूर्ण संघर्षाचा संक्षिप्त परिचय आणि त्यातील महत्त्वाचे टप्पे यांची मांडणी करण्यात आली आहे. माहितीपूर्ण मजकूर आणि ऐतिहासिक छायाचित्रांमुळे नागरिकांना त्या काळातील आव्हानात्मक परिस्थिती आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती मिळेल. हे प्रदर्शन सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. मान्यवरांचे स्वागत डॉ. टरके यांनी लोकराज्य मासिक व पुष्पगुच्छ देऊन केले.

**आमदार आपल्या...**

आधी जण उपस्थित होते. बीड विधानसभा मतदारसंघात आमदार संदीप क्षीरसागर यांनी आमदार आपल्या गावी व दारी हा उपक्रम हाती घेतल्याने जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत . स्वतः गावोगावी जाऊन लोकांचे प्रश्न ऐकून ते लगेचसोडवण्याचा प्रयत्न संदीप भैया हे करीत असल्यामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

**निवासी जिल्हाधिकारी....**

प्रतिवर्षी वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते २५ जून रोजी सन्मानपत्र, पेन, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षी हाच सोहळा रविवार दिनांक २९ जून २०२५ रोजी बीड येथील स.मा. गर्गे भवन, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या जवळ, तुळजाई चौक,बीड येथे सकाळी ११ वाजता निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब, गृह उपविभागीय पोलीस अधिकारी उमाकांत

पान १ वरून...

कस्तुरे सर यांच्यासह लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान, सत्कार ,गुणगौरव करण्यात येणार आहे. या सत्कारास पात्र असलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी आपला मार्क्स मेमो, संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता तालुका जिल्हा पिन कोड सह, तसेच पासपोर्ट फोटो २७ जून पर्यंत व्हाट्सअप नंबर ९४ २२ ७४ ४६ ०५ किंवा ९९ ६० ४६ ३२ ४४ या नंबर वर पाठवून नोंदणी करावी असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष विकास स्वामी, सचिव वैभव स्वामी, उपाध्यक्ष सौ वैशाली स्वामी, सहसचिव सौ रुपाली स्वामी, कार्याध्यक्ष सौ वनमाला स्वामी, समन्वयक सौ वर्षा स्वामी, सदस्य शशांक स्वामी, वेदांत स्वामी तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त विलास स्वामी, अशोक स्वामी, दिलीप स्वामी, प्रशांत स्वामी, सतीश स्वामी, नागेश स्वामी, राजेश स्वामी आदींनी केले आहे.

प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक

इयत्ता १० वी आणि इयत्ता १२ वी परीक्षेमध्ये वीरशैव लिंगायत समाजातील ज्या विद्यार्थ्यांनी सत्कार स्वीकारण्यासाठी जगद्विवेक प्रतिष्ठान कडे नोंदणी केली आहे. अशा विद्यार्थ्यांमधून जे विद्यार्थी दहावी आणि बारावी दोन्ही वर्गातून स्वतंत्ररित्या प्रथम

पान १ वरून...

येतील त्यांना १००१ रुपये रोख बक्षीस तर द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख ७०० रुपये बक्षीस तसेच तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख ५०० रुपये बक्षीस देण्यात येणार असून उत्तेजनार्थ निवडलेल्या विद्यार्थ्यास ३०० रुपये रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**बीडमध्ये बालेपीरमधील....**

साठी १५ जूनपासून माऊली शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलति जिजामाता प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय, बीड ही अनधिकृत शाळा सुरु करण्यात आली आहे. बालेपीर परिसरात १० ते १२ शाळा आहेत. जिजामाता विद्यालयाला शासनाची परवानगी नसताना ही अनधिकृत शाळा सुरु केली असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच ही शाळा अशीच सुरु राहीली तर अनुदानित शाळेवरील शिक्षक अतिरिक्त होण्याचा धोका असल्याचेही म्हटले आहे. त्यामुळे संबंधिक अनधिकृत शाळेची चौकशी करुन शाळेवर कारवाई करावी, अशी मागणी १० शाळेच्या शिक्षकांनी शिक्षणाधिकारी (प्रा.) व (मा.) यांच्याकडे केली आहे. निवेदन देणाऱ्या शाळांमध्ये प्रगती विद्यालय, लालबहादुर शास्त्री विद्यालय, संत गाडगेबाबा विद्यालय, के.पी. एस. विद्यालय, सुभद्राबाई मा. विद्यालय, इंदिरा प्रा. मा. विद्यालय यासह १० ते १२ शाळांचा समावेश आहे.

# पोलीस निरीक्षक पवार यांच्या हस्ते पुजा करून वारकर्यांना अल्पोपहार व महाप्रसादाचे वाटप

बीड /प्रतिनिधी

श्रीसंत मुक्ताईंची पालखी मुक्ताईनगर येथून पंढरपूर कडे रवाना होत असताना दोन दिवसांसाठी बीड शहरात मुक्कामी असते, यावेळी बीड शहरातील भाविक मोठ्या उत्साहात पालखीचे स्वागत करत वारकरी बांधवांच्या सेवेतच विठ्ठलाचे दर्शन करत असतात.

बीड शहरातुन पंढरपुरकड़े प्रस्थान करते वेळी सामाजिक क्षेत्रातील संकल्प युवा सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने पालखीचे हर्षोल्लासात मध्यवर्ती बसस्थानक समोर स्वागत करण्यात आले. हा पालखी सोहळा शहरातील माळीवेस चौक, सुभाष रोड, बसस्थानकमार्गे वारकरी दिंड्या, पताका, ध्वजकरी, विठूरायाचे नामस्मरण करीत कपिलधार येथील मंदिरात मुक्कामी जातात. यावेळी वारकर्यांना संकल्प युवा सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने बस स्थानक समोर हॉटेल अन्नपूर्णा येथे फराळाचे वाटप करण्याची परंपरा गेल्या १० वर्षी पासुन अवितरपणे चालू आहे. याहीवर्षी शिवाजीनगर पोलिस निरीक्षक श्री. किशोर पवार साहेब यांच्या हस्ते पुजा करून अल्पोपहार वाटप करण्यात आला आहे, यावेळी पालखी सोहळ्याचे संस्थानप्रमुख ऍड. रविंद्र पाटील, दिंडीचे प्रमुख हरणे पाटील, महंत श्री. अमृताश्रम महाराज, पोलीस निरीक्षक श्री. पवार साहेब, किशनसिंग चौहान यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून आदरयुक्त सत्कार प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या हस्ते करण्यात आला.




श्रीसंत मुक्ताईंच्या पालखीची महाआरती प्रतिष्ठानचे प्रमुख संतोष मेहता,प्रशांत डोरले, तिलक झाडीवाले यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकर्याला फराळ म्हणून केळी, चिवडा, राजगीरा लाडू, चिप्स असे विविध फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी शहरातील नागरिक व सर्व व्यापारी सह प्रतिष्ठानचे सदस्य कृष्णा जाधव, बाबासाहेब वणवे, रवी देवकर, करण पाबळे, जयराज जाधव, हर्षवर्धन पाटील, प्रवीण मते, आदित्य नवले, वैभव काळे, श्रेय जैन, यशराज जाधव, देवेश जैन सह अन्य सहकारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# भटक्या विमुक्तांना न्याय देण्यासाठी प्रशासन खंबीर पाठीशी राहणार

## अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांचे प्रतिपादन

महसूल विभाग व भटके विमुक्त विकास परिषदेच्या वतीने राजे उमाजी नाईक महाराजस्व अभियानांतर्गत बीडला भटक्या विमुक्तांसाठी शिबिराचे आयोजन सोमवार दि २३ /६ रोजी व्ही.आय.पी. लॉन्स पेठ बीड येथे महाराष्ट्र राज्य भटके -विमुक्त विकास परीषद व शासनाच्या वतीने राजे उमाजी नाईक महाराजस्व अभियान व छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत भटक्या - विमुक्त जातीतील लोकांना प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या शिबिराचे उद्घाटक म्हणून अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , डॉ सुभाष जोशी , माजी जि प अध्यक्ष मीराताई गांधले , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , प्रशांत सुपेकर , भाजप भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ लक्ष्मण जाधव , भटके विमुक्त मित्रमंडळ सदस्य - बालाजी पवार , भूषण पवार , राजेंद्र बन , डॉ . पैठणकर , डॉ श्रीमती चोले , सामाजिक कार्यकर्ता बाबासाहेब कोकाटे , नेहा माळी , महसूल विभाग अधिकारी , मंडळ अधिकारी , तलाठी , ग्रामसेवक , आरोग्य विभाग अधिकारी , नगरपरिषद अधिकारी उपस्थिती होती .यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना भटके - विमुक्त विकास परीषद जिल्हा संयोजक ओमप्रकाश गिरी यांनी विकास परिषदेच्या कार्याचा लेखाजोखा मांडला . राज्यात आजपर्यंत ३५००० लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवून देण्याचे भाग्य लाभल्याची माहिती दिली . यावेळी भटके विमुक्त विकास परीषद मराठवाडा प्रांत संयोजक उमेश जोगी , डॉ.सुभाष जोशी , डॉ.पैठणकर यांनी भटके विमुक्त मित्र मंडळ प्रत्येक वस्ती पर्यंत पोहचून हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहे असे मत मांडले . भटक्या विमुक्त समाजाच्या अनेक समस्या आहेत . समाजाच्या मुख्य प्रवाहापासून हा घटक लांब आहे . इंग्रजांच्या काळापासून या समाजाचे राष्ट्रनिर्मितीत महत्त्वाचे योगदान आहे . या समाजाला पुढे आणणे हे प्रत्येकाने आपले कर्तव्य समजले पाहिजे , अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली .

या शिबिरात जात प्रमाणपत्र, आयुषमान भारत कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, उत्पन्न प्रमाणपत्र देण्यासाठी ३५० लाभार्थी यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली .बीड जिल्ह्यातील सर्व वस्तीचे सर्वेक्षण करून भटके विमुक्त विकास परिषदेने शासनाच्या या कार्यात मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल जिल्हा अभियान प्रमुख बबन गिरी व भगवान पवार यांचा प्रशासनाच्या वतीने सन्मान करण्यात आला . यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नमूद केले की भटक्या विमुक्त समाजासाठी अनेक




जण आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत . माननीय अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी कोल्हापूर येथे कार्यरत असताना या समाजासाठी मोठ्या प्रमाणात कार्य केले आहे . विविध प्रमाणपत्रांचे वाटप केले आहे . आपण माननीय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात सुद्धा भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्याची मोहीम कायमस्वरूपी सुरू ठेवू . या समाजासाठी रहिवासी प्रमाणपत्र काढणे , उत्पन्नाचे प्रमाणपत्र काढणे , जातीचे प्रमाणपत्र काढणे यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा तहसील कार्यालयामार्फत उपलब्ध करून दिल्या जातील .

# चौसाळा येथे गुरूवारी संत मुक्ताबाई पालखीचे आगमन

चौसाळा (प्रतिनिधी)

प्रतिवर्षा प्रमाणे याहीवर्षी श्री संत मुक्ताबाई पालखी सोहळा गेल्या कित्येक वर्षापासून बालाघाटावरील चौसाळा नगरीतून मार्गस्थ होतो ही वारकरी सेवा कै. दिगंबर तात्या शिंदे यांच्यापासून सुरू केलेली आहे त्यानंतर त्यांचे नातू कै. संजय (दादा )शिंदे यांनी सुरू ठेवली व त्यांच्या पश्चात आता विठ्ठल जनार्दन शिंदे हे या दिंडीचे भव्य दिव्य असे वाजत

गाजत दिंडीचे स्वागत चौसाळा नगरीत करतात ही दिंडी दिनांक २६ जून २०२५ रोजी चौसाळा शहरात दाखल होत असुन याची जय्यत तयारी सुरू आहे

तरी चौसाळा व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी गुरूवार दि. २६ जून २०२५ रोजी मुक्ताबाईच्या पालखी सोहळ्याच्या महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी मुक्ताईनगर चौसाळा या ठिकाणी उपस्थित राहावे असे आवाहन समर्थ विठ्ठलराव शिंदे पाटील यांनी केले आहे





# सलग २५ वर्षांपासून रक्तदान करत स्वत:चा वाढदिवस साजरा करणारा अवलिया निलेश कुमार राठौर

बीड /प्रतिनिधी

प्रत्येक जन आपला वाढदिवस हा वेग वेगळ्या प्रकारे साजरा करतात.त्या प्रमाणे निलेशकुमार राठौर यांनी २३ जून रोजी शासकीय रुग्णालय बीड येथे स्वइच्छेने जाऊन रक्तदान करून आपला वाढदिवस साजरा केला. आता पर्यंत त्यांनी २५ वेळेस रक्तदान केले. दरवर्षी ते आपला वाढदिवस रक्तदान करून साजरा करतात.

करू या दान रक्ताचे फेडू या ऋण समाजाचे या उक्ती प्रमाणे ते नेहमी रक्तदान करतात. या प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना त्यांनी सांगितले कि, मी एक रक्तदाता आहे आणि मला माणूस असल्याचा अभिमान वाटतो. प्रत्येकाने जरी दर ३ महिन्याला रक्तदान करणे शक्य झाले नाही वर्षातून एकदा तरी आपल्या वाढदिवसाला रक्तदान करावे. नव्या युगाचा नवा नारा वाढदिवसाला रक्तदान करा. रक्त है कुठल्याही कारखान्यात तयार होत नाही वेळ प्रसंगी मानवाने मानवालाच रक्त द्यावे लागते वेळ प्रसंगीच मनुष्याला रक्ताच्याएक एक थेंबाची किंमत समजते. दाना मध्ये सर्वश्रेष्ठ दान हे रक्ताचे आहे. रक्तदान हे जीवदान आहे. त्यांचे हे कार्य पाहून त्यांचा मित्र परिवारही रक्तदान करण्यास प्रवर्त झाला आहे. या वर्षी त्यांच्या वाढदिवस २३ जून रोजी सोमवार, प्रदोष, शिवरात्री असे देवादीदेव महादेव चे व्रत एकसोबत व रक्तदान सारखे पवित्र कार्य त्यांच्या हातून घडल्याबद्दल ते स्वतःला फार भाग्यवान समजतात असे त्यांनी सांगितले.

बलभीम महाविद्यालय येथे वरिष्ठ अध्यापक असतांना त्यांनी वाणिज्य विभागामध्ये रक्तदान



शिबिराचे आयोजन केले होते ज्यामध्ये बऱ्याचश्या विद्यार्थ्यांनी रक्तदान केले होते. या कार्याबद्दल बलभीम महाविद्यालया मार्फत त्यांचा सत्कारही करण्यात आला होता. रक्तदान सारखे चांगले सामाजिक कार्य ते करत असल्यामुळे त्यांचे अभिनंदन व्दा. म. ना. सह. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोमीन साहेब, सोनी साहेब, मुख्य शाखेचे शाखा व्यवस्थापक काळे साहेब, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग, जिल्हा शल्यचिकित्सक संजय राउत साहेब, अंजली नाइकवाडे मॅडम (रक्त संक्रमण अधिकारी), गायकवाड मामा, महाराष्ट्र प्रांतल्य राठोड क्षत्रिय समाज (ट्रस्ट) तर्फे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कॅपटण आसाराम राठौर जन. सेक्रेटरी मित्र परिवार यांनी अभिनंदन करून हे कार्य असेच पुढे सुरु ठेवावे या साठी शुभेच्छा दिल्या.

# पहाट फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार अँड राज पाटील यांना जाहीर.......

वडवणी:- प्रतिनिधी

अँड राज पाटील हे लढा दुष्काळीशी फाउंडेशनच्या माध्यमातून जिल्हाभरात लाखो झाडांचे वाटप करुन पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे सामजीक कार्य करत आहेत. तिगाव दुष्काळमुक्त व टँकर मुक्त करण्यासाठी जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात केलेली आहेत, याच सामाजिक कार्याची दखल संभाजीनगर येथील पहाट फाउंडेशनने घेतली आहे. त्यांना पहाट फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार जाहीर झाला असून त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुरस्कार वितरण सोहळा २८ जून रोजी बुलडाणा येथे होणार आहे.वृक्षतोडीमुळे पर्यावरणाची मोठी हानी होत चाललेली आहे. यामध्ये वेळेवर पाऊस न आल्याने कठीण दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. सर्व मानवी जीवनाला जीवन जगण्यासाठी ऑक्सिजनची मोठी आवश्यकता आहे. ऑक्सिजनची कमतरता झाली तर काय होऊ शकते, याची प्रचिती कोरोना काळामध्ये सर्वांना आलेली आहे. झाडे टिकली तरच मानव जिवन जगण शक्य आहे. पुढील धोका टाळण्यासाठी पृथ्वीचे संतुलन टिकून राहण्यासाठी झाडे लावणे, झाडे जगवने, पाणी आडवने, पाणी जमीनीत मुरवने ही काळाची गरज ओळखुन अँड. राज पाटील यांनी लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून संपूर्ण बीड जिल्ह्यातील गावागावांमध्ये झाडांचे महत्त्व सांगत जिजाऊ फिरता जन्मोउत्सव साजरा केला. यामध्ये वृक्षांची वाटप करून तेथील नागरिकांना ती झाडे जगविण्याची जिम्मेदारी दिली. मित्रपरिवारांच्या वाढदिवसानिमित्त व महापुरुषांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेणे व रक्तदात्यांना झाडांचे वाटप करणे, मराठा आरक्षण चळवळीमध्येही येणाऱ्या सर्व समाज बांधवांना वृक्षांचे वाटप केले. दर वर्षी संक्रातीला सरपंच सौ. अर्चनाताई पाटील व राज पाटील या दाम्पत्याने महिलांना वाण म्हणून पुस्तक व झाडाचे वाटप केले. तालुक्यातील १०८ जि.प. शाळेतील १२,००० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, कोरोना काळात गरजूंना किराणा किट व औषधांचे वाटप, सांगली, कोल्हापूर महापूर ग्रस्तांना २ ट्रक उपयोगी साहित्य प्रत्यक्षात वाटप, गावातील शेती रस्ते १६ किलोमीटर स्वखर्चातून, तलाव गाळ मुक्त व नद्या खोलीकरण सरळीकरण, गावातील



बेरोजगार युवकांना हार्वेस्टर ऑपरेटर ड्रायव्हर या माध्यमातून शंभर पेक्षा जास्त तरुनांना रोजगार उपलब्ध करून दिला. संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये वृक्षमित्र अँड राज पाटील यांनी मोफत लाखो वृक्ष वाटप केली नाही तर ती जगवूनही दाखवली. आपल्या तिगाव जन्मभूमी पाणी आडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबऊन विविध जलसंधारणाच्या कामे नदी खोलीकरण व रुंदीकरण तलावातील गाळ उपसा करणे, बंधाऱ्याचे खोलीकरण करून जमिनीत पाणी टिकून राहण्यासाठी ताडपत्रीचे आच्छादन करून त्यामध्ये मोठया प्रमाणात पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे तिगाव हे दुष्काळमुक्त व टँकर मुक्त होण्यास मदत होणार आहे. आदी कामाची दखल पहाट फाउंडेशन संभाजीनगर यांनी घेतली आहे. वृक्षमित्र लढा दुष्काळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष राज पाटील यांना पहाट फाउंडेशन चा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार जाहीर केला असून पुरस्कार वितरण सोहळा २८ जून रोजी बुलढाणा येथे होणार आहे. त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन वर्षाव होत आहे.पहाट फाउंडेशन चा सामाजिक कार्यकर्ता म्हणून पुरस्कार जाहीर झाल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे खास विश्वासू आमदार अमितजी गोरखे, माजलगाव मतदार संघांचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी अँड राज पाटील यांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# आ.संदीप क्षीरसागरांची 'आमदार आपल्या गावी व दारी' मोहीम नागरिकांसाठी दिलासादायक

## पाली, लिंबागणेश, मांजरसुंबा पंचायत समिती गणातील नागरिकांच्या सुटल्या अडचणी

बीड (प्रतिनिधी):- आ.संदीप क्षीरसागर यांनी 'आमदार आपल्या गावी व दारी' ही संकल्पना घेऊन बुधवारी (दि.२५) रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश, मांजरसुंबा आणि पाली पंचायत समिती गणांमधील नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी विशेष मोहीम राबवली.

या मोहिमेदरम्यान प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहभागाने गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्यात आल्या.यावेळी सामाजिक कल्याणकारी योजनांचा लाभ थेट गावकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी श्रावण बाळ योजना आणि संजय गांधी निराधार योजनेची मंजूरी पत्रे ग्रामस्थांना वितरित करण्यात आली. या उपक्रमामुळे गावकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास मदत झाली असून, स्थानिक पातळीवर प्रशासकीय सहकार्य वाढल्याचे दिसून आले. आ.क्षीरसागर यांनी या मोहिमेद्वारे गावकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. हा उपक्रम ग्रामीण भागातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरला आहे. या बैठकीस माजी आ.सय्यद



सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह तहसील कार्यालयाचे सर्व अधिकारी, पंचायत समिती, महावितरण, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, लघुपाटबंधारे विभाग आदी प्रशासकीय विभागांचे अधिकारी व चौसाळा जिल्हा परिषद गटातील गावांमधील नागरिक उपस्थित होते.

# शेवगा तालुका अंबड येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या कामाची चौकशी करण्याची मागणी

प्रतिनिधी/ अंबड

अंबड तालुक्यातील शेवगा येथील ग्रामपंचायत ने विकास कामे केलेल्या कामाची तात्काळ चौकशी समिती नेमून चौकशी अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे देण्याबाबतची निवेदन सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब खरात यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबड यांना निवेदनाद्वारे केली आहे.

मागणी निवेदनामध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्रामसेवक वास्तव्याबाबतची सत्य परिस्थिती, दलित वस्ती मध्ये केलेल्या कामाबाबत, पंधराव्या वित्त आयोग का मधून खर्च केलेल्या कमानियाय नमुना नंबर पाच व बाराच्या रजिस्टर वृत्ती व आराखड्या प्रमाणे खर्च केल्या असल्याचा आराखड्याची व आराखड्या मधील झालेल्या खर्च सोबत देण्यात आलेल्या विकास कामे झालेल्या चौकशी करणे बाबत , ग्रामपंचायत शिपाई भरती चे सविस्तर व भरतीचे सर्व कागदपत्राची व त्याच बरोबर आलेल्या अर्ज व मुख्य शिपाई भरती केल्या बाबतची माहिती चौकशी द्वारे करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

त्याचबरोबर पाण्याची टाकी व पाईपलाईन चौकशी, मासिक सभा ग्रामसभा व ग्रामनिधी अत्यंत महत्त्वपूर्ण कामकाजाबाबत ची ग्रामस्थांची वारंवार तक्रार असल्या कारणाने या लेखी



निवेदनाद्वारे चौकशी समिती नेमून चौकशी अहवाल देण्याबाबतची मागणी बाबासाहेब हरिभाऊ खरात यांनी केली आहे.



अंबड : सन १९७५ ते १९७७ या काळात लागू करण्यात आलेल्या आणीबाणीच्या काळात, भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी व मूल्यांच्या जपणुकीसाठी अत्यंत कठोर परिस्थितीतही निडरपणे उभे राहिलेले व हुकुमशाहीचा धाडसाने प्रतिकार करून, कारावास स्वीकारून स्वातंत्र्य, अभिव्यक्ती आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी संघर्ष करणारे, तसेच आणीबाणी मध्ये करावयास भोगलेले श्री अंकुश पुंजाराम पवार, श्री अरुण अच्युतराव उपाध्ये, श्री अंकन्ना उषांना शेवाळे, श्री त्र्यंबकराव रामराव मुळे, श्री श्री आप्पासाहेब मुक्ताराम वैराळ, श्री हुकुमचंद कपूरचंद जैन, श्री बापूराव किसनराव राऊत, श्री निवृत्ती बाबासाहेब मते, श्रीमती निलाबाई मुरलीधर लांडे, श्रीमती चंद्रकला शंकर गुंजाळ, श्रीमती छबाबाई नामदेव गायके, श्रीमती मंगलबाई बापूसाहेब साळुंके, श्रीमती तारामती साहेबराव खरात, श्रीमती कल्पना नंदकिशोर ओझा, श्रीमती सुधाताई उमाकांत तोडकर, श्रीमती गोदाबाई द्वारकादास मंत्री, श्री संतोष लक्ष्मण मोडेकर, श्री मुरलीधर प्रल्हादराव जोशी यांचा सन्मान उपविभागीय कार्यालय अंबड येथे पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन भाजपा जालना जिल्हाध्यक्ष आमदार श्री नारायण कुचे यांच्या हस्ते करण्यात आला, यावेळी जालना जिल्ह्यात सर्वात जास्त मिसा बंदी कायदे करण्यात आले अशा अनेक आणीबाणीत करावयास भोगलेल्या व्यक्तींनी त्यांच्यासोबत घडलेल्या घटनांचा घटनाक्रम सांगितला,

यावेळी अंबड तहसीलदार विजय चव्हाण, औदुंबर बागडे, रमेश भाऊ पैठणे, अंबड नगरपरिषद मुख्याधिकारी मनोज उकर्डे, अंबड पोलीस निरीक्षक घोडके साहेब, रमेश शहाणे, गंगाधर वराडे, सौरभ कुलकर्णी, संदीप खरात, फेरोज शेख, बाळू खरात, बाळू शहाणे, शिवाजी मोरे, सय्यद अनिस, विठ्ठलसिंग राणा, सुरेश गुडे, संजय राठोड, संदीप गितकने, लक्ष्मण राक्षे, लक्ष्मण पेदे, सुनील बिडे, सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते....

# अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या विद्यमान संचालिका वत्सलाबाई शिंदे यांचे निधन

अंबाजोगाई (वार्ताहर)

अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या विद्यमान संचालिका श्रीमती वत्सलाबाई वासुदेवराव शिंदे (वय ८५) रा. होळ तालुका केज जिल्हा बीड यांचे दिनांक २५- ६- २०२५ रोजी सकाळी साडेसात वाजनेच्या सुमारास अचानक हृदय विकाराच्या तीव्र झटका आल्याने निधन.

याविषयीं प्राप्त माहिती अशी कि, मौजे होळ, ता केज जिल्हा बिड येथील व अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याच्या विद्यमान संचलिका श्रीमती वत्सलाबाई वासुदेवराव शिंदे या गेल्या वर्षापासून आजारी असल्यामुळे लातूर, अंबाजोगाई येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते मात्र दिनांक २५-६-२०२५ रोजी सकाळी ७-३० वाजता अचानक तिव्र झटका आल्याने निधन झाले,स्व वत्सलाबाई शिंदे यांच्या पार्थिवावर मौजे होळ येथील शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले, यावेळी अंबाजोगाई सहकारी साखर कारखाने याचे चेअरमन रमेश आडसकर, व्हाईस चेअरमन दत्तात्रय पाटील, केज पंचायत समितीचे सभापती ऋषिकेश आडसकर , मा उपसभापती नेताजी शिंदे, होळचे विद्यमान सरपंच योगेश शिंदे , अंबा साखर कारखान्याचे सेक्रेटरी सुरेश साखरे, मुख्य शेतकी अधिकारी सचिन बागल, यांच्यासह होळ पंचक्रोशीतील हजारो नागरिक उपस्थित होते. स्व. वत्सला शिंदे यांच्या पश्चात एक मुलगा आनंदराव शिंदे,दोन मुली, सून, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे.



# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या

## जन्मदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

बीड :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिवस २६ जून दरवर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्यात येतो. सदर सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड या कार्यालयाच्या वतीने दि. २६ जून, २०२५ रोजी सकाळी १.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्य कार्यक्रमापूर्वी दि. २६ जून, २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा ते सामाजिक न्याय भवनापर्यंत समतादिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर समता दिंडीचा मार्ग सुभाष रोड, शिवाजी महाराज पुतळा ते सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड असा असुन सामाजिक न्याय भवनात समता दिडीचा समारोप होईल. तसेच मुख्य कार्यक्रम सकाळी ११.०० वाजता सुरु होईल. सदर सामाजिक न्याय दिनाच्या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदिप भोगले यांनी केले आहे.

# श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाची पायी दिंडी मार्गस्थ

पाटोदा /प्रतिनिधी

श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचा यंदाची पायी दिंडी सोहळा अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणामध्ये पंढरीच्या पांडुरंगाच्या दिशेने नतमस्तक होण्यासाठी हजारो भावी भक्तांच्या उपस्थितीमध्ये आज मार्गस्थ झाला.

गेल्या अनेक वर्षाची परंपरा असलेली संत वामनभाऊ महाराजांच्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावरचा पायी दिंडी सोहळा यंदाही तितक्यात उत्स्फूर्त वातावरणामध्ये दुपारनंतर मार्गस्थ झाला.संत वामनभाऊ महाराजांनी आयुष्यभर जनसामान्यांना योग्य मार्गावर जाण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून क्रांती केली. समता बंधुत्व ऐक्य आणि सर्व धर्म समभाव या मुल्यांची जोपासना करत मानवतावादाचा धर्म आणि शिकवण त्यांनी दिली. या माणुसकीच्या वाटेवर चालण्यासाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.पंढरपूरच्या विठुरायाला एकादशीच्या निमित्ताने भेटण्यासाठी पायी दिंडी सोहळा अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणामध्ये संत वामनभाऊ महाराजांच्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावरील समाधी ला नतमस्तक होऊन सुरुवात झाला.विविध ठिकाणी मुक्कामाला ही दिंडी असेल. श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर आज विविध जाती धर्म पंथांचे आणि विविध तालुका आणि जिल्ह्यातील भाविक भक्त एकत्र झाले आणि हरिनामाच्या जयघोषाने या दिंडीला अवघे पंढरीचे वातावरण निर्माण झाले.श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती ह भ प महंत विठ्ठल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये हा पायी दिंडी सोहळा मार्गस्थ होताना अत्यंत पवित्र आणि अध्यात्मिक वातावरणाने परिसर अक्षरशः दुमदुमून गेला...



# संबंधित अधिकाऱ्याला कमीशनचे दाम,पहिल्याच रस्त्यावर खडीचे थर रचून काम !

## गुत्तेदार चतुर:अधिकारी फितूर बाजारपेठेतील मुख्य रस्त्याचे नवीन काम रात्रीच्या अंधारात थातूरमातूर.!

किल्ले धारूर (गोवर्धन बडे)

शहरातील रस्त्यासह विकास कामाची वाट लागली होती. विकास कामे होत नसल्याने शहर भकास झाले होते. आता कुठे विकास कामे व्हायला सुरुवात झाली. त्यामध्ये कोट्यावधी रुपयाचा निधी येऊन मुख्य बाजारपेठेचा रस्त्याचे काम चालू आहेत पण त्या कामात सुद्धा संबंधित अधिकाऱ्याला गुत्तेदाराने कमिशन देऊन पहिल्याच डांबरी रस्त्यावर खडीचे थर रचून व गुत्तेदार रात्रीच्या अंधारात काम उरकण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसत आहे.धारूर शहरांमध्ये व्यापारी नागरिकांच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर छत्रपती शिवाजी महाराज, चौक काशिनाथ चौक, तसेच हनुमान मंदिराकडे जाणारा मुख्य रस्त्याचे काम सध्याला सुरू आहे परंतु संबंधित अधिकारी याना कमीशन देऊन पहिल्याच रस्त्यावर खडीचे थर देऊन गुत्तेदार काम करत आसल्याचे नागरिकांमध्ये चर्चा चालू आहे.या बाबी कडे नागरिक दुर्लक्ष का करत आहेत,एक तर कित्येक वर्षापासून रस्त्याची मागणी असताना, कसं बसा रस्त्याचे काम होत आहे. या कारणाने नागरिक सुद्धा गप बसलेले दिसत आहेत. याचा फायदा तसेच संबंधित अधिकाऱ्याला गुत्तेदारांनी कमिशन देऊन मुख्य बाजारपेठेतील रस्त्याचे काम थातुरमातुर करत असल्याचे नागरिकांमध्ये बोलले जात आहे. मुख्य बाजारपेठेच्या रस्त्याला खोदकाम मुरूम न करता पहिल्याच डांबरी रस्त्यावर खडेचे थर रचून रस्त्याचे काम करत असल्याचे दिसत आहे. हे काम दिवसा कमी व रात्रीच्या वेळीवमोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. या सर्व प्रकारामुळे नागरिकांना पुन्हा खंडामेय रस्ता पाहायला मिळणार हे नक्कीच. त्यामुळे नागरिकांनी याकडे लक्ष दिले पाहिजे.तसेच याकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे अशी मागणी धारूर शहरातील व तालुक्यातील नागरिकाकडून केली जात आहे.



# राज्यातील वीज ग्राहकांना सरसकट दिलासा

## घरगुती ग्राहकांसोबत औद्योगिक आणि व्यावसायिक वीजदरात कपात

बीड : राज्यातील वीज ग्राहकांसाठी वीजदर ठरविण्यासाठी महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निर्णय दिला असून घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे.

राज्याच्या इतिहासात प्रथमच वीजदरात कपातीचा प्रस्ताव महावितरणकडून सादर झाला आणि आयोगाने आगामी पाचही वर्षात वीजदर कमी करण्याचा आदेश दिला. स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी दहा टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये आहेत.

राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू केल्यामुळे साडेसात एचपीपर्यंतचे पंप असलेल्या राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे.वीजदर कमी करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही महत्त्वाकांक्षी योजना उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी अंमलात येणाऱ्या या योजनेत विकेंद्रित स्वरुपात सौर ऊर्जेद्वारे वीज तयार करून त्यावर पंप चालविण्यात येणार आहेत. या योजनेची क्षमता सोळा हजार मेगावॅट इतकी असेल व त्या माध्यमातून सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या कमी दराने वीज उपलब्ध होणार आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत योजना पूर्ण होणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना दिलासा देतानाच महावितरणच्या वीजखरेदी खर्चात कपात करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरली आहे.

महावितरणने नजिकच्या भविष्यातील विजेची गरज ध्यानात घेऊन रिसोर्स डेक्कसी प्लॅन तयार केला असून त्यानुसार २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीजखरेदी करार केले आहेत. त्यापैकी ३१ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांमधून मिळणार आहे. ही वीज अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्याने आगामी पाच वर्षात महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. त्यामुळे महावितरणला वीजदर कपातीचा प्रस्ताव मांडता आला आणि आयोगानेही त्यानुसार आदेश दिला.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या याचिकेनुसार प्रथमच वीजदर कपातीचा आदेश दिला आहे. वीजदर कपातीमुळे घरगुती ग्राहकांना

# सेवानिवृत्त फौजदार भगवानराव वडमारे यांचे अल्पशा आजाराने निधन

बीड /प्रतिनिधी

सेवानिवृत्त फौजदार भगवानराव वडमारे यांचे अल्पशा आजाराने आज सकाळी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. शाहू फुले आंबेडकर चळवळ येथील प्रखर नेतृत्व तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा उभारणी संदर्भात महत्वपूर्ण संघर्ष भूमिका बजावली होती.त्यांच्या पार्थिवावर आज सकाळी ०८:०० वाजता भगवान बाबा येथे अंत्यविधी करण्यात येणार आहे.त्यांचे बंधू व परिवारातील बरेच नातेवाईक मुंबई तसेच बाहेरगावी असल्याकारणाने उद्या सकाळी आठ वाजता अंत्यविधीचा वेळ ठेवण्यात आलेला आहे. त्यांच्या पश्चात ०५ मुली आणि ०४ मुले आणि नातवंडे आहेत.



# जुन्या पिढीचा इतिहास नवीन पिढीला दिशादर्शक -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मान पत्र देऊन कार्याचा गौरव

बीड जिल्ह्यातील कारावास भोगलेल्या ५७ ज्येष्ठांचा सन्मान

बीड (प्रतिनिधी)

लोकशाही मूल्ये, अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी झटलेल्या सर्व जुन्या पिढीचा इतिहास नवीन पिढीला दिशादर्शक आहे. आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या सर्व ज्येष्ठांच्या पाठिशी शासन खंबीरपणे सोबत आहे. आपणास पात्र असलेल्या सर्व सेवा प्रशासनाकडून तत्परतेने देण्यात येतील, असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज उपस्थितांना दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आणीबाणीच्या काळात लोकशाहीकरिता लढा देताना सामाजिक व राजनैतिक कारणासाठी कारावास भोगलेल्या बीड जिल्ह्यातील ५७ जणांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्वाक्षरी असलेले सन्मान पत्र जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याहस्ते आज सन्मानपूर्वक देण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, कारावास भोगलेले विजयकुमार पालसिंगलकर आदींची



मंचावर उपस्थिती होती. १९७५ ते १९७७ काळात लागू केलेल्या आणीबाणीच्या काळात भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी व मुल्याच्या जपणुकीसाठी अत्यंत कठोर परिस्थितीत निडरपणे उभे राहिलात. आपण हुकुमशाहीचा धाडसाने प्रतिकार करून, कारावास स्वीकारून स्वातंत्र्य अभिव्यक्ती आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी संघर्ष केला. देशाच्या लोकशाही परंपरेचे रक्षण करण्याच्या या लढ्यातील आपल्या योगदानाचा आम्ही अभिमानाने गौरव करीत आहोत. हे सन्मान पत्र आपल्या त्याग, धैर्य आणि दृढतेला सलाम करण्यासाठी आहे. आपण आपल्या कृतीतून विचारांतून आणि त्यागातून नव्या पिढीसमोर लोकशाही मुल्यांचा आदर्श ठेवला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन्मान पत्रात नमूद केले आहे. प्रातिनिधिक स्वरूपात श्री. पालसिंगलकर, कुसुम सरवदे, उद्धव नागरगोजे, नारायण पांडे, दिलीप सोनवळकर, श्रीमती संजीवनी जोगदंड यांना जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते सन्मान पत्र देण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी सन्मान पत्राचे वाचन केले. तसेच उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# जामखेड नगर रोड येथे अवैध देशी विदेशी दारू विक्री करताना डी वाय एस पी संतोष खाडे यांची कारवाइ

## जामखेड शहरासह तालुक्यात अवैद्य व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहे...


जामखेड /प्रतिनिधी

परिविक्षाधीन पोलीस उपाधिक्षक संतोष खाडे यांच्या पथकाकडून गेल्या काही दिवसांपासून जामखेड शहरासह तालुक्यात अवैद्य व्यवसायावर धडक कारवाई चालूच आहे. दि २३ रोजी रात्री १०.४५ वाजता जामखेड शहरातील नगर रोडवरील हॉटेल कृष्णा वर धडक छापा टाकला.या छाप्यात विनापरवाना ११०२५ रूपयांची देशी विदेशी दारू पकडण्यात आली. हॉटेल कृष्णा तुकाराम रामराव ढोले यांच्या मालकीचे आहे. पो कॉं अमोल श्रीरंग आजबे यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र राज्य दारू अधिनियम कलम ६५ नूसार जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच

अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपाधिक्षक संतोष खाडे यांच्या पथकाच्या जिल्हाभर कारवाया सूरू आहे.यावेळी पोसई/राजेंद्र



वाघ, सफौ/शकील शेख, पोहेकॉ/शंकर चौधरी, पोहेकॉ/अरविंद भिंगारदिवे, पोहेकॉ अजय साठे, पोहेकॉ/मल्लीकार्जुन बनकर, पोहेकॉ दिनेश मोरे, पोहेकॉ/दिगंबर कारखिले, पोहेकॉ उमेश खेडकर, पोकॉ/सुनिल दिघे, पोकॉ/अमोल कांबळे, पोकॉ/जालिंदर दहिफळे, पोकॉ/दिपक जाधव व पोकॉ/विजय ढाकणे यांचे पथकाने केली आहेत. रात्री पून्हा संतोष खाडे यांनी जामखेडला मोर्चा वळवला आहे. संतोष खाडे यांच्या कधी पायी तर कधी गाडीने करत असलेल्या धडक पेट्रोलिंगची मोठी चर्चा चालू आहे. शहरासह तालुक्यात अवैद्य व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहे.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# घरफोडी करणारा आरोपी पोलिसांच्या ताब्यात पाथरी येथील प्रकरण

## ६ लाख ७३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त





परभणी (प्रतिनिधी)

पाथरी येथील माळीवाडा परिसरात घरफोडी करून आरोपीने सोन्या, चांदीचे दागिने आणि नगद रक्कम चोरून नेली होती. या प्रकरणाचा पोलिसांनी छडा लावत घरफोडी करणार्या आरोपीच्या मुसक्या आवळत त्याच्याकडून ७८ ग्रॅम सोन्याचे दागिने (अंदाजे किंमत ६ लाख ७३ हजार रूपये) हस्तगत केले आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, पाथरी येथील माळीवाडा परिसरात फिर्यादीची सासु वारल्याने ते अंत्यविधीसाठी गेले असतांना गुरूवारी (दि.१२) चोरटयांनी घरात घुसून सोन्या-चांदीचे दागिने आणि नगद १ लाख रूपये चोरून नेले होते. यावरून पाथरी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी स्थानिक गुन्हा शाखेच्या पोलिस निरिक्षक विवेकानंद पाटील यांना या प्रकरणी आरोपींचा शोध घेण्याबाबत मार्गदर्शनपर आदेश दिले होते. यावरून स्थानिक गुन्हा शाखेचे एक पथक तयार करण्यात आले. घरफोडीच्या गुन्हयाचा तंत्रशुध्द पध्दतीने तपास करीत असतांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून हा गुन्हा आरोपी किशोर तेजराव वायाळ (वय ४५ रा.मेरा ता.चिखली जि.बुलढाणा) याने त्याच्या साथीदारासोबत केला. यावरून त्यास पाठलाग करून शिताफीने ताब्यात घेत चौकशी केली असता सदर गुन्हा केल्याची आरोपीने माहिती दिली.

दरम्यान घरफोडीतील चोरलेल्या दागिण्यांपैकी ७८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आरोपीकडून यावेळी हस्तगत करण्यात आले. या गुन्हयातील चोरलेली रक्कम व दागिणे विकून मिळालेली रक्कम आरोपीने स्वतःच्या बँक खात्यावर जमा केल्याचे दिसून आले आहे. यावरून आरोपीचे बँक खाते गोठविण्याची प्रक्रिया अवलंबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगीतले. ही कारवाई पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात अप्पर पोलिस अधिक्षक यशवंत काळे यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरिक्षक विवेकानंद पाटील, सहाय्यक पोलिस निरिक्षक पांडूरंग भारती, पोलिस अंमलदार मधुकर चट्टे, सुग्रिव केंद्रे, निलेश भुजबळ, व्ही.एन.सातपुते, तुपसुंदर, हनवते, हुसेन रफियोद्दीन आदींसह सायबर पोलिस ठाण्याचे गणेश कौटकर यांच्या पथकाने मिळून केली.

# ॲक्सियम ४ मिशनचे सावित्रीबाई फुले मुलींचे हायस्कूल मध्ये थेट प्रक्षेपण



परभणी (प्रतिनिधी)

समस्त भारतीयांसाठी अभिमानाचा क्षण असलेले अक्सियम४ मिशन ऊड्डाणाचे थेट प्रक्षेपण सावित्रीबाई फुले मुलींचे हायस्कूल येथे प्रोजेक्टर व्दारे सर्व विद्यार्थीनींनी दाखविण्यात आले.भारताचे सुपुत्र शुभेंद्र शुक्ला यांचा सहभाग असलेल्या या मोहीमे संदर्भात माहिती विज्ञान शिक्षिका सौ.अरुणा पाटील आणि विठ्ठल शिंदे यांनी दिली.अक्सियम मिशन४ हे स्पेसएक्स आणि नासा यांच्या भागीदारीत अक्सिओम स्पेसव्दारे चालविले जाणारे आंतरराष्टीय अंतराळ स्थानकासाठी केलेले खाजगी अंतराळ ऊड्डाण होय.शालेय विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची गोडी निर्माण करण्यासाठी दाखविण्यात आलेल्या या थेट प्रक्षेपणाचा विद्यार्थीनींनी ऊस्फुर्त आनंद घेतला.या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका सौ.जया जाधव,सौ.आशा देशमुख,यशवंत मकरंद,प्रणिता पांचाळ,रमेश मुळे,सिताराम ठाकरे..यांनी परिश्रम घेतले

# आंतरराष्ट्रीय ऑलम्पिक दिन उत्साहात साजरा

परभणी (प्रतिनिधी)

जगातील सर्वोत्तम क्रीडा महोत्सव ऑलम्पिकची स्थापना ग्रीस येथे दि. २३ जून १८९४ वर्षी पियरे डी कॉबर्टिन यांनी केली. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पीक समिती तसेच जगातील सुमारे २०० पेक्षा अधिक देशाचे ऑलिम्पिक संघ हे जागतिक ऑलिम्पिक समितीच्या स्थापनेचा दिवस म्हणून २३ जून रोजी ऑलिम्पिक दिवस साजरा करतात, त्याचप्रमाणे आपल्या देशाचे भारतीय ऑलिम्पिक संघ व राज्याचे महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन हे सन १९५२ वर्षापासून ऑलिम्पिक डे व सप्ताह साजरा करीत आहे. त्या अनुषंगाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणीद्वारे जिल्हा क्रीडा संकुल येथे ऑलिम्पिक दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी विविध खेळाचे प्रशिक्षक उपस्थित होते.

बास्केटबॉल मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद, खाशाबा जाधव (भारतासाठी कुस्तीमध्ये कास्य पदक जिंकणाऱ्या नॉर्मन प्रिचर्ड यांच्यानंतर खाशाबा जाधव हे स्वतंत्र भारतातील पहिले वैयक्तिक खेळाडू होते, ज्यांनी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकले होते) आणि मिल्खा सिंग (हे एक भारतीय धावपटू होते, ज्यांना 'फ्लाइंग शीख' म्हणून ओळखले जायचे) यांच्या फोटोंना विविध प्रशिक्षकाच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच विविध राष्ट्रीय खेळाडूचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. त्या प्रसंगी उपस्थित खेळाडूंनी बॉक्सींग, जिम्नॅस्टीक, स्केटींग या खेळाचे प्रात्यक्षिक दाखवले.या कार्यक्रमाला जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे, राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, क्रीडा अधिकारी कल्याण पोले, सुयश नाटकर, रोहन औंढेकर, रमेश खुणे, उन्मेश गाडेकर (बॅडमिंटन), सूर्यकांत डहाळे (स्केटींग) प्रदिप लटपटे (जिम्नॅस्टीक), आशिष सुर्यवंशी (क्रिकेट), योगेश आदमे (रग्बी), प्रकाश पंडित (बास्केटबॉल) धिरज नाईकवाडे, भागवत दुधारे, विजय जोंधळे आदीची उपस्थिती होती. घेतले.



# परभणीत एलसीडी टिव्हीमध्ये निघाला साप !

परभणी (प्रतिनिधी)

शहरातील गव्हाणे चौक नजिकच्या निरस हॉस्पिटलसमोरील धनुबाई प्लॉट येथील मारोती दुबाकर यांच्या घरी बुधवारी (दि.२५) दुपारी एकच्या दरम्यान एलसीडी टिव्हीमध्ये साप आढळला. सर्पमित्र रणजीत कारेगावकर यांनी त्याला पकडून परिवाराला भयमुक्त केले.

२५ जुलै रोजी दुपारी एकच्या दरम्यान घरातील महिलांना सिरियल बघताना टीव्हीच्या पडद्यावर साप खाली वर जाताना दिसला. सुरूवातीला तो सिरियलमध्येच आहे असे वाटले पण एक दोन चॅनल बदलले तर तो खरेच आहे हे लक्षात येताच घरातील मुलींनी त्याचा व्हिडीओ केला व शेजारी राहणारे रमेश थोरात यांना कळवले. थोरात यांनी सर्पमित्र रणजित कारेगावकर यांना बोलावले. राजेश दुबाकर हे स्वतः टीव्ही मेकॅनिक असल्यामुळे त्यांनी त्वरीत तो एल.सी.डी. खोलला. टिव्हीत एका कोपऱ्यात साप आढळला. त्याला कारेगावकर यांनी पकडून तो कवड्या जातीचा बिनविषारी साप असल्याचे सांगत दुबाकर कुटुंबास भयमुक्त केले. यावेळी ज्ञानेश्वर खटिंग, राजेश दुबाकर यांनी कारेगावकर यांना सहकार्य केले.



# टेनिस व्हॉलीबॉल राष्ट्रीय निवड चाचणी कोपरखैरणे, नवी मुंबई येथे महाराष्ट्र राज्य संघाची घोषणा जल्लोषात

नवी मुंबई (प्रतिनिधी)

२७ वी राष्ट्रीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धा भाटपारा छत्तीसगड येथे दि. २६ जून ते ३० जून या कालावधीत होणार असून सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघ सहभागी होणार आहे. त्याकरिता महाराष्ट्र संघाची निवड चाचणी टेनिस व्हॉलीबॉल महाराष्ट्र असोसिएशनच्या मान्यतेने आणि नवी मुंबई टेनिस व्हॉलीबॉल असोसिएशनच्या विद्यमाने क्राईस्ट अकॅडमी स्कूल अँड ज्यू कॉलेज, कोपरखैरणे येथे आयोजित करण्यात आली होती. या निवड चाचणी करिता महाराष्ट्रातील नवी मुंबई, ठाणे, मुंबई, परभणी, हिंगोली, मुंबई उपनगर, पुणे, नाशिक, अमरावती अशा विविध जिल्ह्यातही खेळाडूंनी ज्युनिअर आणि सब ज्युनिअर गटात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या निवड चाचणी साठी टेनिस व्हॉलीबॉल खेळाचे जनक व्यंकटेश वांगवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आणि क्राईस्ट अकॅडमी स्कूल चे संचालक फादर जेसन यांनी मुलां सोबत संवाद साधला. तसेच महाराष्ट्र टेनिस व्हॉलीबॉल चे राज्य सचिव गणेश माळवे, राज्य उपाध्यक्ष कोरडे, राज्य कोषाध्यक्ष डॉ.दिनेश शिगारम, बालभारती शिक्षक तज्ञ श्रीमती प्रगती भावसार मॅडम, अशोक शिंदे,आशिष ओबेरॉय, सचिन भोसले यांची उपस्थिती होती. ज्युनिअर मुले: कृष्णा अहिरे विवेक साळुंखे ,प्रसाद महाले मयूर बोरसे ,प्रताप पौळ ,अनंत धापसे सब-ज्युनिअर मुले: ईश्वर मोरे दिव्यांशु चांद ,वेदांत महामाने गौरव चौधरी ,मयूर निकम विर पाटील. ज्युनिअर मुली : वेदिका बेंद्रे मृणाली सरवदे , श्रेया सिंग सृष्टी शिंदे ,मान्यता जैन अंकिता सरगर. सब- ज्युनिअर मिश्र दुहेरी :राजवीर भोसले सोनाक्षी कदम, ज्युनिअर मिश्र दुहेरी :शिवम कदम ,श्रेया धावन प्रशिक्षक :उज्वला शिंदे शिवदास खुपसे,गणेश आम्ले संघ व्यवस्थापक :निलेश माळवे.




पोखर्णी नृसिंह : दहावी , बारावी व सांस्कृतिक स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा नृसिंह माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. बी. शेळके तर प्रमूख पाहुणे म्हणून एन. एन. पवार, एस.बी. बुजूर्गे यांच्यासह सर्व शिक्षकांची उपस्थिती होती. यावेळी दहावी वर्गातील कीर्ती बालासाहेब वाघ , सायली बळीराम वाघ , अर्जुन नरहरी वाघ, मुक्ता नरहरी आव्हाड, अंजली लक्ष्मण पाटील यांचा तर बारावीतील प्रणिता गव्हाणे, वसुंधरा राऊत, कीर्ती घायतिडक व सुजाता धोत्रे या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर कोल्हापूर येथील कनेरी मठात झालेल्या बालसंस्कार शिबिरात उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार झाला. गुणवंत सोबत त्यांच्या पालकांचाही शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी नरहरी वैरागर, कुलदीप उंडाळकर , शैलेश ढगे, प्रा. संजय गजमल, माणिक कदम , गोपाळ मोरे , सुनील गवई, राजू दिपके, गणेश धोपटे, शंकर मुंडे, लक्ष्मीकांत जोगेवार , राजेभाऊ मोरे, रामप्रसाद आवचार, राम खरबे, अलका यादव, कविता लोखंडे, अनिल वाघ, गणपती गिराम, बळीराम बानायत, ज्ञानोबा दुधाटे, वैजनाथ गिराम, नारायण एलकेवाड यांची उपस्थिती होती.

# जेष्ठ नागरिक मसाजी सुतारे यांचे निधन

परभणी (प्रतिनिधी)

साखला प्लॉट येथील ज्येष्ठ नागरिक मसाजी रानोजी सुतारे (वय ८०) यांचे परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात मंगळवार दिनांक २४ रोजी रात्री दिड वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले आहे.सेलू तालुक्यातील काजळी - रोहिना या त्यांच्या राहत्या गावी दुपारी एक वाजता अत्यंसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी ,एक मुलगा,दोन मुली,नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक श्रमिक एकजूटचे वसुली



प्रतिनिधी सुनिल सुतारे यांचे ते वडील होत.



# भाजपा परभणी महानगरकडून 'संविधान हत्या दिन' जिल्हास्तरीय कार्यक्रम

## आणिबाणीत शिक्षा भोगलेल्या स्वातंत्र्य सैनानींचा सत्कार

परभणी (प्रतिनिधी)

आणीबाणी ही केवळ लोकशाहीची हत्याचं नव्हती, तर संविधानाच्या मूळ संकल्पनेवर घातलेला घाला होता. हुकूमशाहीचा वरवंटा किती भयानक असतो याची जाणीव भावी पिढ्यांना व्हावी यासाठी हा काळा दिवस लक्षात ठेवायला हवा अशी अपेक्षा आज परभणी येथे आयोजित 'संविधान हत्या दिवसा' निमित्त आयोजित कार्यक्रमात श्री.रामरावजी केंद्रे यांनी बोलताना व्यक्त केली.

भारतीय जनता पार्टी परभणी महानगरच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना आणीबाणीच्या काळ्या दिवसांच्या काळात देशाने अनुभवलेल्या हुकुमशाहीच्या कटु आठवणींची उजळणी करतानाच आणीबाणीच्या काळात देशाच्या लोकशाहीसाठी संघर्ष करणाऱ्या ज्ञात-अज्ञात वीरांना वंदन केले. १९७५ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी घोषित केली होती. त्या घटनेला ५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने आज 'संविधान हत्या दिन' पाळला जात आहे. भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेची सुरुवात 'वी द पीपल ऑफ इंडिया'.. अशी आहे, मात्र यातील पीपल म्हणजेच लोकांना दडपण्याचा प्रयत्न आणीबाणीच्या काळात झाला. आणीबाणी लादणाऱ्या इंदिरा गांधी यांना नंतर पराभवाला समोरे जावे लागले. यातुलनेत आताचे मोदी सरकार फारच सहिष्णू असून कितीही टोकाची टीका झाली तरीही आकसाने कारवाई करण्यात येत नाही असे यावेळी बोलताना महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी आवर्जून नमूद केले.

भाजपा परभणी महानगरच्या वतीने २५ जुन रोजी आणिबाणीत शिक्षा भोगलेल्या स्वातंत्र्य सैनानींचा प्रत्यक्ष घरी जाऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सत्कार करताना अभियान संयोजक मधुकर गव्हाणे, प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड एन.डी.देशमुख, प्रसिद्धी प्रमुख प्रवीण गायकवाड आदि उपस्थित होते.

# आणीबाणीच्या विविध घटनांच्या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन

परभणी (प्रतिनिधी)

देशात दि. २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू करण्यात आली होती. या घटनेला २५ जून २०२५ रोजी ५० वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त जिल्हा प्रशासन व जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन परभणी येथील प्रशासकीय इमारतीच्या नवीन वास्तुत बुधवार २५ जून २०२५ रोजी करण्यात आले आहे. सकाळी ११.३० वा. या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

या प्रदर्शनात आणीबाणीच्या अनुषंगाने घडलेल्या विविध घटना-घडामोडींची तसेच आणीबाणीविरोधी संघर्षात सहभागी झालेल्या विविध कार्यकर्ते-नागरिकांची छायाचित्रे व माहितीचा समावेश असणार आहे. या माहिती प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन परभणी जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांनो, १५ जुलैपूर्वी पीक कर्जाचे नूतनीकरण करून घ्या जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे

परभणी (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वेळेत पीक कर्जाचे नूतनीकरण केल्यास त्यांना शून्य टक्के व्याजाने नव्याने पीक कर्ज उपलब्ध होणार आहे अन्यथा जास्त व्याज दर भरावा लागेल. त्यामुळे शेतकऱ्यांनी १५ जुलैपूर्वी पीक कर्जाचे नूतनीकरण करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पीक कर्ज खाते थकबाकीमध्ये जावू नये. ते थकबाकीमध्ये गेल्यास शेतकऱ्याचा क्रेडिट रिपोर्ट खराब होतो. शेतकऱ्यांनी पीक कर्ज वेळेत नूतनीकरण केल्यास त्यांना दीर्घ मुदत कर्ज, शैक्षणिक कर्ज, गृह कर्ज, बचत गटासाठी कर्ज, किंवा इतर कुठलेही कर्ज मिळवताना कोणतीही अडचण येत नाही. त्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी पीक कर्जाचे नूतनीकरण करून घेणे गरजेचे असल्याचे आहे. सर्व बँकांनी कॅलेंडर तयार केले असून, त्या बँक शाखा त्या-त्या दिवशी गावात येणार आहे त्यादिवशी शेतकऱ्यांनी ग्रामपंचायतीमध्ये येऊन नूतनीकरणाचा अर्ज करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वेळेत पीक कर्जाचे नूतनीकरण केल्यास त्यांना शून्य टक्के व्याजाने नव्याने पीक कर्ज उपलब्ध होणार आहे अन्यथा जास्त व्याज दर भरावा लागेल. त्यामुळे शेतकऱ्यांनी १५ जुलैपूर्वी पीक कर्जाचे नूतनीकरण करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले आहे.

# संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांचे मानधन, स्वस्त धान्य आणि शिधापत्रिका प्रश्नी राजकिशोर मोदींचे तहसीलदारांना निवेदन

## सामन्याच्या विविध जनहितार्थ प्रश्नी आंदोलन छेडण्याचा राजकिशोर मोदींचा प्रशासनाला इशारा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई तालुक्यातील संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना मानधन द्यावे तसेच गोरगरिबांना स्वस्त धान्य आणि शिधापत्रिका देण्यात याव्यात या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आज बुधवारी तहसीलदार यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनातील मुद्द्यांची सोडवणूक न झाल्यास जनहितार्थ आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा यावेळी राजकिशोर मोदी यांनी प्रशासनाला दिला.

राजकिशोर मोदी यांच्यावतीने बुधवार दि २५ रोजी देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या वर्षभरापासून वरील लाभार्थ्यांना त्यांचे पगार मिळत नाहीत. यामुळे लाभार्थी आपल्या कार्यालयाचे खेटे मारून त्रस्त झाले आहेत. या योजनेतील गोरगरीब तसेच वयोवृद्ध लाभार्थी आहेत. त्यांची शारिरीक आणि मानसिक स्थिती दुबळी झालेली असते, अशा परिस्थितीत त्यांनी आपल्या कार्यालयाच्या चकरा मारणे आणि आपण आणि आपल्या कर्मचाऱ्यांनी त्यांची दखल न घेता त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे ही बाब लाभार्थ्यांवर अन्याय करणारी आहे. तेव्हा आपण अशा लाभार्थ्यांची जाणीवपूर्वक दखल घेऊन, त्यांच्या अडचणी सोडवून रखडलेल्या पगारी देणे तसेच अंबाजोगाई तालुक्यात अनेक गोरगरीब कुटुंब आहेत, ज्यांना रेशन मिळत नाही, मात्र



उपजीविकेसाठी त्यांना रेशनची आवश्यकता आहे, अशा कुटुंबांना रेशन दुकानावरून रेशन मिळेल यासाठी शिधापत्रिका द्याव्यात. तरी निवेदनाची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही त्वरित करावी. अन्यथा जनहितार्थ आंदोलन छेडण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी. असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी दिला आहे.

यावर चर्चा करताना तहसीलदार विलास तरंगे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत या मागण्याचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन राजकिशोर मोदी यांना दिले. सदरील निवेदनावर राजकिशोर मोदी यांच्यासह महादेव आदमाने, डॉ.राजेश इंगोले, किशोर परदेशी,धम्मा सरवदे, खालेद चाऊस रफिक गवळी, अशोक देवकर, बबन पाणकोळी, सुभाष पाणकोळी, अकबर पठाण,सुधाकर टेकाळे, सचिन जाधव आकाश कराड, दत्ता सरवदे, चेतन मोदी, सय्यद ताहेर, खलील जाफरी, मुन्ना पठाण, शरद काळे, महेबूब गवळी, जावेद शेख, गोविंद पोतंगले, रोशन लाड, कमलाकर हेडे, फारूख शेख चाँद, अकबर पठाण, वजीर शेख, सय्यद रशिद, संतोष चिमणे, सुदाम देवकर, संतोष माने, सचिन जाधव, शुभम लखेरा, महेश कदम, रोहन कुरे, अमीत परदेशी, अस्लम शेख, जमदार पठाण, विश्वजीत शिंदे, विशाल पोटभरे, महेश वेडे, मुन्ना वेडे, राम घोडके, निखिल वांजरखेडकर, सिध्दार्थ साबळे, कैलास कांबळे आदींसह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# तहसिलदारांनी तलाठ्यांमार्फत गावोगावी कँम्प घेऊन निराधार लाभार्थ्यांचे

## डीबीटी करुन घ्यावे अन्यथा फोरमच्या स्टाईलने आंदोलन करणार - फोरमचे नेते यशवंत खंडागळे

आष्टी (प्रतिनिधी)आष्टी तालुक्यातील अनेक गोरगरीब निराधार, दिव्यांग लाभार्थी हे गेले सहा महिन्यापासुन संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेच्या मानधनापासुन वंचीत आहेत. या गरीब लाभार्थ्यांवर उपसमारीची वेळ आलेली आहे. वृध्द, दिव्यांग, निराधार महिला, पुरुष हे रस्त्यावर आलेले आहेत. या लाभार्थ्यांना सहा महिन्यापासुन पैसे मिळालेले नाहीत. या गरीबांचे बेहाल आमच्यासारख्या सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व चळवळ चालविणा-या कार्यकर्त्यांला सहन होत नाही. वेळोवेळी या गरीबांचे जलद गतीने डीबीटी करण्यात यावे अशी मागणी करुनही त्या मागणीकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. नाईलाज म्हणून आम्ही लोकशाही मार्गाचा अवलंब करुन आष्टी तहसिलदारांनी तलाठ्यांमार्फत गावोगावी कम्प घेऊन निराधार लाभार्थीचे डीबीटी करुन घ्यावे अन्यथा फोरमच्या स्टाईलने



आंदोलन करणार आहोत असा ईशारा डा. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे नेते तथा आष्टी पंचायत समितीचे सदस्य यशवंत खंडागळे यांनी दिला आहे.आष्टी तहसिल कार्यालयात संजय गांधी निराधार योजना विभागातील कर्मचाऱ्यांचे काम मंद गतीने सुरु आहे. येथे वृध्द लोक डीबीटीसाठी येतात परंतु त्यांना हेलपाटे मारावे लागतात म्हणून तहसिलदार यांनी तलाठ्यांमार्फत गावोगावी कम्प घेऊन निराधार लाभार्थीचे १५ दिवसात डीबीटी करुन घ्यावे अन्यथा फोरम स्टाईलने आंदोलन होणार आहे. या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री, दोनही उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, आ. सुरेश धस यांच्याकडे दिले आहे. गरीबांची आर्थिक पिळवणूक व कुचंबना थांबवावी या व इतर मागण्यांसाठी तहसिल कार्यालयासमोर फोरमचे नेते यशवंत खंडागळे हजारो कार्यकर्त्यांसह आंदोलन करणार आहेत.



# संत एकनाथ महाराज पालखीचे पाटोदा शहरात स्वागत

## मुस्लिम उद्योजक सय्यद इम्रान यांच्या कडून वारकऱ्यांना दूध वाटप करत दिला सामाजिक एकतेचा संदेश

पाटोदा (प्रतिनिधी)

भक्ती, परंपरा आणि अध्यात्मिकतेचा संगम असलेल्या संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याचे पाटोदा शहरात भव्य स्वागत करण्यात आले. विविध ठिकाणांहून आलेल्या वारकऱ्यांच्या जयजयकारात, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भक्तिभावाच्या वातावरणात पालखी शहरात पोहोचली.या सोहळ्याला धर्मीय सलोख्याचा सुंदर नमुना पाहायला मिळाला. पाटोदा येथील मुस्लिम समाजातील युवा उद्योजक सय्यद इम्रान यांनी आपल्या सामाजिक बांधिलकी जपत वारकऱ्यांसाठी दूध वाटप उपक्रम राबवून एकतेचा अत्यंत सकारात्मक संदेश दिला. सय्यद इम्रान म्हणाले, संत एकनाथ महाराज हे माणुसकी, समतेचा आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारे संत होते. त्यांच्या पालखी सोहळ्यात सेवा करण्याची संधी मिळणे हे आमच्यासाठी भाग्य आहे. समाज एकत्र राहिला तरच खरी प्रगती शक्य आहे.या उपक्रमाचे वारकऱ्यांसह शहरातील नागरिकांनी मन:पूर्वक स्वागत केले. विविध धर्मांतील लोक एकत्र येऊन सण-उत्सवात सहभागी होत असल्याने समाजात भिंती नाही, तर एकता होत असल्याचा संदेश या उपक्रमातून मिळाला.संत एकनाथ महाराजांचे कार्य आणि विचार हे सर्वधर्मीय ऐक्याचे प्रतीक होते, आणि आजही त्यांच्या शिकवणुकीनुसारच पाटोदा शहरात सर्व समाज एकत्र येऊन त्यांचे स्मरण करत आहेत.सय्यद इम्रान यांचा हा उपक्रम केवळ सेवा नसून, सामाजिक सलोखा आणि एकात्मतेचा जिवंत संदेश आहे.




# आणीबाणी लादली तो दिवस भारतीय लोकशाहीसाठी काळा दिवस होय-अंबादास देशमुख

उदगीर (प्रतिनिधी)

ज्या दिवशी भारतीयांवर आणीबाणी लादल्या गेली तो दिवस भारतीय लोकशाहीसाठी काळा दिवस म्हणून गणला जाईल असे उद्गार आणीबाणी मध्ये स्थानबद्ध झालेले डॉ. अंबादास देशमुख यांनी काढले. लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात आणीबाणीच्या काळात तुरुंगात गेलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शंकरराव लासूणे , मधुकरराव वट्टमवार, उर्मिला देशमुख,निर्मलाताई देशपांडे, दत्ता देशपांडे, प्राथमिकचे मुख्याध्यापक अंकुशराव मिरगुडे, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले व्यासपीठावर उपस्थित होते.

आणीबाणीला लादलेल्या दिवसाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने त्या काळात तुरुंगवास भोगलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला त्यामध्ये डॉ.अंबादास देशमुख यांना दीड वर्ष तुरुंगवास सहन करावा लागला होता. त्यामुळे विद्यालयातर्फे अंबादास देशमुख व उर्मिला देशमुख यांचा सपत्नीक तर कैलासवासी नारायणराव देशपांडे यांच्या पत्नी निर्मलाताई देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला.

सत्कार प्रसंगी डॉ अंबादास देशमुख यांनी आणीबाणी ही लोकशाहीसाठी कशी धोकादायक होती? व त्या काळातली विदारक परिस्थिती विद्यार्थ्यांसमोर मांडली.आणिबाणीत मिसा खाली अटक करण्यात आलेल्या व्यक्तींचा कसा छळ करण्यात आला, किती यातना सहन केल्या याबाबत सविस्तर माहिती दिली. मधुकरराव वट्टमवार यांनी अंबादास देशमुख व कै.नारायण देशपांडे यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. अध्यक्षीय समारोपात शंकरराव लासूणे यांनी आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्या त्यागी व्यक्तीमुळेच लोकशाही मजबूत झाल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीता मोरे, प्रास्ताविक अनिता येलमटे यांनी केले तर आभार निलेश मांडवकर यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पाटोदा येथील जुण्या मंजूर एम.आय.डी.सी. च्या जागाचे वाटप रद्ध करून

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा शहरातील गट क्र.१६६/अ, १६६/आ, १६६इ मधील शेतकऱ्यांची जमीनी, गेल्या ३० वर्षांपूर्वी एम.आय.डी.सी. साठी मामुली रकमा देऊन संपादित करण्यात आलेल्या आहेत. त्यावर प्लॉट वरून कोणाला वाटप केले ते अभिज्ञ आहे. सध्या त्या जमिनीवर/ प्लॉट वर एकही उद्योग दिसत नाहीत. सदरील जमिन, राजकीय लोकांनी त्यांच्या जवळच्या नातेवाईक यांच्या नावे घेतल्या असल्याचे कळते. पाटोदा तालुक्यातील नवीन युवक बेरोजगार लोकांना उद्योगधंदा करण्यासाठी त्यांना प्लॉट नाहीत, ते बेरोजगारीत फिरत आहेत. पाटोदा तालुका हा दुष्काळी भाग असून येथे कुठलाही उद्योगधंदा नाही, त्यामुळे ज्या लोकांनी सदरील प्लॉट घेतले आहेत व मुदतीच्या आत सदरील प्लॉटवर उद्योग सरू केले नाहीत, ज्या कारणासाठी सदरील जमीनी संपादित केल्या त्यासाठी वापरलेल्या नाही. त्यामुळे चखऊ ने त्यांची जूनी -श्रश्रींशपीं रद्ध करून त्वरीत प्लॉट वापस घ्यावेत व ते प्लॉट नवीन उद्योजकांना नियमाप्रमाणे पुन्हा लिलाव पद्धतीने नवीन वाटप करावेत, या प्रकरणात लवकरात लवकर कारवाई करावी, अशी विनंती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी बीडचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उद्योग मंत्री उद्योग मंत्री, सचिव उद्योग विभाग मंत्रालय मुंबई, संचालक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुंबई, प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ छ.संभाजीनगर यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# खोटं बोलण्यात वस्ताद असलेल्या संजय राऊत यांनी फेक नरेटिव्ह तयार करू नये

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कधीच आणिबाणीचे समर्थन केलं नाही - भाजपा प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

खोटं बोलण्यात वस्ताद असलेल्या संजय राऊत यांनी फेक नरेटिव्ह तयार करू नये. कारण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कधीच आणिबाणीचे समर्थन केलं नाही असे भाजपा प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी सांगितले.भाजपा प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, देशात राजकीय पक्षांच्या प्रवक्त्यामध्ये खोटं बोलण्याची स्पर्धा लावली. तर ठाकरे गटाचे मुख्यप्रवक्ते संजय राऊत यांचा पहिला क्रमांक येऊ शकतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कधीच आणिबाणीचा समर्थन केलं नसताना खासदार संजय राऊत मात्र खोटं बोलत जनतेची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात. यासंदर्भात प्रसिद्धीसाठी काढलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले की, शिवसेना उबाठा गटाचे मुख्य प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी काल जाहीरपणे खोटं बोलत संघाने आणिबाणीला पाठिंबा दिल्याचे सांगितलं तत्कालीन सरसंघचालक स्वर्गीय बाळासाहेब देवरस यांच्या नांवाचा उल्लेख ही त्यांनी प्रसार माध्यमातून समोर बोलताना केला. यावर राऊतांचा समाचार घेताना कुलकर्णी म्हणाले की, संजय राऊत हे खोटे बोलण्यात वस्ताद म्हणून ओळखले जातात. देशातील राज्यातील जनतेची दिशाभूल करण्यासाठी खोटं बोल पण रेटून बोल हा त्यांचा स्थायी स्वभाव आहे. स्वर्गीय बाळासाहेब देवारसांनी आणिबाणीला समर्थन कधीच दिलं नव्हतं या उलट १९७५ ला आणिबाणीच्या काळात संघाचे शेकडो कार्यकर्ते अटक झाले होते. तत्कालीन



पंतप्रधान इंदिराजी गांधींनी त्यांना जेल मध्ये टाकलं, संघावर बंदी देखील घातली होती. स्वर्गीय इंदिराजी गांधी यांनी संघ कार्यकर्ते एकनाथराव कानडे यांच्यामार्फत संघाने राजकीय पक्षाला समर्थन देऊ नये, आम्ही संघावरची बंदी आणिबाणी संपल्यानंतर उठवून दाखवू अशा प्रकारचा प्रस्ताव दिला होता. संघ कार्यकर्त्यांनी तो नाकारला. कारण, देश हितासाठी संघाला हे मान्य नव्हतं. बाळासाहेब देवरस यांनी आणिबाणीचे कधी समर्थन केलं नाही. तशा प्रकारचं त्यांचं कुठल्या पुस्तकात लिखाण देखील नाही. शिवसेना उबाठा गटाचे खासदार संजय राऊत हे केवळ थापाडे प्रवक्ते असल्याने माध्यमांसमोर बोलताना काही पण, बोलायचं सत्य बोलण्यापेक्षा खोटं बोलण्यावर त्यांचा नेहमीच भर असतो. आणिबाणीच्या काळात वृत्तपत्र तथा पत्रकारांना देखील त्याचा फटका खूप बसला, प्रेस कॉन्सिल मूलभूत अधिकार बाजूला ठेवून इंदिरा गांधींनी माध्यमांची केलेली मुस्कटदाबी खऱ्या अर्थाने मागे वळून पत्रकार असलेल्या राऊत यांनी पाहिली तर पत्रकारिता क्षेत्रातील लोकांच्या विषयी त्यांना कळवळा येऊ शकेल २५ जून १९७५ ला रात्री आणीबाणी जाहीर झाली तेव्हा एकाही संपादकांना हेडलाईन बातमी करू नये यासाठी केंद्र स्तरावरून इंदिरा गांधींनी प्रयत्न केले एवढेच नाही तर मथळ्याखाली बातम्या येऊ नये यासाठी विद्युत पुरवठा बंद केल्याची आठवण कुलकर्णी यांनी खासदार संजय राऊत यांना करून दिली आहे.

# माजी मंत्री आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्याकडून शंकर देशमुख यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन

आष्टी (प्रतिनिधी)

प्रिय, श्री. शंकर अनंतराव देशमुख जी, जिल्हाध्यक्ष, बीड, सप्रेम वंदे मातरम् !भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने आपल्या जिल्हाध्यक्षपदी झालेल्या नियुक्तीबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!आपली निवड ही केवळ एक पदाची जबाबदारी नाही, तर ती आपल्या संघटनात्मक निष्ठेची, कार्यक्षमतेची आणि कार्यकर्त्यांशी असलेल्या दृढ बंधाची पोचपावती आहे. पक्षाचे विचार, कार्यपद्धती आणि जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आता आपल्या खांद्यावर आली आहे. भारताने जपानला मागे टाकून जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचा टप्पा गाठला असून, २०२९ पर्यंत तिसऱ्या क्रमांकावर पोहोचण्याच्या वाटेवर आहे. यात आपल्या महाराष्ट्राचे अमूल्य योगदान आहे. ही प्रगती आपल्या कार्यसंस्कृतीचा, नव भारत घडवण्याच्या सामूहिक इच्छाशक्तीचा परिणाम आहे. अशा निर्णायक काळात आपल्यासारख्या जडणघडणीतून तयार झालेल्या नेतृत्वावर विश्वास ठेवला गेला याचा निश्चितच आनंद आहे.

आपल्यामार्फत पक्ष संघटना अधिक बळकट होईल, नव्या कार्यकर्त्यांना दिशा लाभेल, आणि कार्यकाळ हा प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा बाळगतो. या वाटचालीसाठी अटलजींच्या अमर विचारांतून प्रेरणा घेऊया, 'जलना होगा, गलना होगा और हमें कदम मिलाकर एक साथ



चलना होगा। पक्षाच्या मूलमंत्राशी एकनिष्ठ राहून आपण एक भारत, श्रेष्ठ भारत या ध्येयाच्या पूर्ततेसाठी कार्यरत राहाल, अस मला विश्वास आहे. आपण जनतेशी असलेली नाळ अधिक बळकट करत, भाजप सरकारच्या लोककल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवाव्यात व आगामी काळात पक्षाच्या विजयपथावर पुढे वाटचाल व्हावी, हीच अपेक्षा! पुन्हा एकदा आपले मनःपूर्वक अभिनंदन! आपला - सुधीर मुनगंटीवार विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जिल्हा - चंद्रपूर.

वरील आशयाच्या विशेष पत्रान्वये माजी मंत्री तथा विद्यमान आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी शंकर देशमुख यांच्या नियुक्तीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन केले असून त्याबद्दल जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# बीड जिल्ह्यातील सर्व आमदार आणि खासदार कृषी विमा कंपनीवर

मेहरबान - भाई विष्णुपंत घोलप

पाटोदा (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील शेतकरी २०२३ आणि २०२४ सालातील खरीपाच्या विम्यापासून आजही वंचित आहे त्याला बीड जिल्ह्यातील सर्व आमदार आणि खासदार जबाबदार असुन भारतीय कृषी विमा कंपनीवर ते मेहरबान झालेले आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांना विमा मिळत नाही असे परखड मत भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना व्यक्त केले.



२०२३ साली खरीपात पावसाच्या खंडामुळे आणि २०२४ साली खरीपा सततच्या पावसामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची पीके वाया गेली. तात्कालीन परिस्थितीत कृषीमंत्री आणि शासनाने २५% आग्रीम विमा मंजुर केला त्यामधील काही शेतकऱ्यांना २०२३ सालातील खरीपाचा विमा २५% मिळालाही परंतु राहिलेली रक्कम नेमकी किती? २०२३ आणि २०२४ सालातील खरीपाच्या कोणत्या पीकाला किती टक्के विमा मंजुर केला तो अद्याप पर्यंत का मिळाला नाही याला सर्वस्वी बीड जिल्ह्यातील सर्व आमदार आणि खासदार जबाबदार असुन ते भारतीय कृषी विमा कंपनीवर मेहरबान झालेले आहेत जर २०२३ आणि २०२४ सालातील खरीपाचा विमा तात्काळ मिळाली नाही तर शेतकऱ्यांना बरोबर घेऊन भारतीय शेतकरी कामगार पक्ष तिव्र आंदोलन करतील असे परखड मत आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना भाई विष्णुपंत घोलप यांनी व्यक्त केले.